नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ३४ * अंक २४ * * यवतमाळ * | गुरुवार, दिनांक २४ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## गाझियाबादेत बनावट दूतावासाचा पर्दाफाश

■ वृत्तसंस्था, गाझियाबाद, दि. २३ :
उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये एका बनावट दूतावासाचा पदार्फाश झाला आहे. मंगळवारी एसटीएफने त्या ठिकाणी छापा टाकून हर्षवर्धन जैनला अटक केली. त्याच्याकडून व्हीआयपी क्रमांक असलेल्या ४ आलिशान कार जप्त करण्यात आल्या आहेत.

यासोबतच विविध देशांचे आणि कंपन्यांचे ३४ सील देखील सापडले आहेत. याशिवाय परराष्ट्र मंत्रालयाचा सील असलेले बनावट कागदपत्रे आणि ४४.७० लाख रुपये रोख रक्कम देखील जप्त करण्यात आली आहे. हर्षवर्धन केबी ३५ कविनगर येथे घर भाड्याने घेऊन बेकायदेशीरपणे 'वेस्ट आर्क्टिक दूतावास' चालवत होता.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### धनखडांचा वानप्रस्थाश्रम...

आपल्या देशाचे उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांनी अचानक राजीनामा दिला. उपराष्ट्रपती पदावर असताना अशाप्रकारे राजीनामा देण्याची परिस्थिती का उद्भवली? असे काय झाले की अचानक त्यांना राजीनामा द्यावा लागला? उपराष्ट्रपतीपद राष्ट्रपतींच्या नंतर दुसऱ्या क्रमांकाचे पद असते. मग अशा पदावरील महानुभावाने चार लाख रुपये पगाराचे हे पद का सोडले असावे कारण, या चार लाख रुपयांपैकी त्यांना व्यक्तिगत खर्च फारच कमी होत असतो. उपराष्ट्रपतींना राहण्यासाठी मोठे निवासस्थान सरकारी खचार्ने असते, नोकरचाकर आणि इतर सर्व सोयी सुविधा असताना अशा पदाचा त्याग करण्यामागचे नेमके रहस्य काय, हा संपूर्ण भारतवर्षा समोरील खराखुरा प्रश्न आहे. नीट विचार केल्यावर असे दिसत आहे की जगदीप धनखड यांचा मूळ स्वभाव सध्याच्या व्यवस्थेबरोबर चालू शकला नाही. सर्वात आधी ते उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात चांगले वकील म्हणून कार्यरत होते. त्या काळात राजस्थान विधान सभेमध्ये आमदार झाले आणि मग चढत्या भाजणीने म्हणजेच पश्चिम बंगालच्या राज्यपाल मागार्ने थेट दिल्ली दरबारात सामील झाले. विरोधी पक्षांना राज्यसभेत बोलू न देण्यात त्यांचा जबरदस्त हातखंडा होता तसेच ते सर्व व्यवस्थानुकूल होते. पण कायदे बहाद्दर धनखड साहेबांनी सरकारलाही कायदे दाखवणे सुरू केल्याबरोबर त्यांच्या बाबतीत सत्तारूढ दलाकडून असंतोष व्यक्त होऊ लागला होता. म्हणजेच काय तर विरोधी पक्षही नाराज आणि सरकारही नाराज अशा प्रकारची त्यांची वागणूक होती असे सगळेच म्हणतात. विरोधी पक्षांच्या नेत्यांसमोर बोलताना ते सरकार बद्दल विरोधी शेरे मारीत असत ही गोष्ट सुद्धा सरकार आणि विरोधी पक्षातील लोक खाजगी मध्ये सांगतात. राज्यसभेला नियंत्रित करताना केवळ विरोधी पक्षच नाही तर सरकारवरही आपला प्रभाव दाखवणे त्यांनी सुरू केले होते. ते स्वतः ज्या समाजातून आलेले आहेत तो समाज शेतकऱ्यांचा आहे. त्यामुळे एका कार्यक्रमात त्यांनी शेतक?यांचे मुद्दे व्यवस्थित हाताळले नाही म्हणून सरकारवरही ताशेरे ओढले होते. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे एकीकडे विरोधी पक्ष धनखड सरकारच्या प्रवक्त्यांप्रमाणे बोलतात असे म्हणत होते तर दुसरीकडे सरकारी पक्ष त्यांच्या विशिष्ट वागणुकीमुळे प्रचंड नाराज होता. परवा विरोधी पक्षांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध ६४ सह्यांचा प्रस्ताव दिला आणि तो धनखड यांनी स्वीकृत केला, त्यामुळेच ठिणगी पडली असावी असे राजधानीच्या राजकीय वर्तुळात दबक्या आवाजात बोलले जात आहे. दिल्लीच्या राजकीय वर्तुळातील बरेचजण असे म्हणतात की त्यानंतर धनखड यांच्यावरती प्रचंड मोठा दबाव आणला होता. एक तर राजीनामा द्या अन्यथा तुमच्या विरुद्ध महाभियोग प्रस्ताव आणू अशी धमकी देण्यात आल्याचे सांगण्यात येते. धनखड साहेब उपराष्ट्रपती पदानंतर त्यापेक्षा वरिष्ठ पदाची अपेक्षा करीत होते पण त्यांनी ज्या पदावर असताना जी अनेक राजकीय विधाने केली आणि न्यायालयाबद्दलही आपले मत व्यक्त केले. म्हणजेच अशा स्वतंत्र बुद्धीने वागण्याचा त्यांचा स्वभाव आणि कल सरकारलाही पसंत पडला नव्हता. आता इकडे आड आणि तिकडे विहीर अशी स्थिती झाल्यावर त्यांच्याकडे राजीनाम्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय शिल्लक उरला नव्हता, अशा गोष्टी बोलल्या जात आहेत. आता प्रश्न असा आहे की मोठ्या गाजावाजाने कोलकाता येथून दिल्लीला आणल्यावरही त्यांच्यामध्ये कोलकाता येथील सरकारला त्रस्त करण्याची संधी इकडेही साधता येईल काय असे त्यांचे वागणे होते. थोडक्यात ते कुठेही असले तरी आम्ही वर म्हटल्याप्रमाणे सरकार बरोबर मिळूनमिसळून वागत नव्हते आणि हेच त्यांच्या गच्छंतीचे कारण असावे. सध्या तरी अशी हिम्मत दाखवणारा नेता कोणाला चालणार नव्हता तसा तो इथेही चालला नाही. धनखड साहेब आता शांत बसणार म्हणजेच वानप्रस्थाश्रमाला जाणार की आणखी काही करणार याबद्दल आमच्याकडे माहिती नाही. उद्या काय होईल याची भाकीत करणारे आम्ही ज्योतिषी नाही. तरीही धनखड साहेब सत्यपाल मलिक साहेबांच्या मागार्ने जाणार नाहीत, ही आशा देशाला आणि सरकारी पक्षाला असावी.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# अल कायदाच्या ४ दहशतवाद्यांना अटक

### गुजरातेत २, दिल्ली व नोएडातून प्रत्येकी १ आरोपीला अटक : सोशल मीडिया हँडल व चॅट्स जप्त

■ वृत्तसंस्था
अहमदाबाद, दि. २३ :
गुजरात एटीएसने अल-कायदाच्या चार दहशतवाद्यांना अटक केली आहे. गुजरात एटीएसने बुधवारी सांगितले की त्यांनी दोघांना, दिल्लीतून एका आणि नोएडामधून एका दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे.

हे चारही जण अल-कायदाच्या दहशतवादी मॉडेलशी संबंधित होते आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि काही संशयास्पद ॲप्सद्वारे लोकांना अल-कायदाशी जोडण्यात सक्रिय होते.

गुजरात एटीएसने त्यांच्याकडून काही सोशल मीडिया हँडल आणि चॅट्स देखील जप्त केले आहेत. सायबर टीम याचाही तपास करत आहे. एटीएसला अशीही माहिती मिळाली आहे की हे चौघेही मेसेज ऑटो-डिलीट करणाऱ्या ॲप्लिकेशनचा वापर करत होते.

दरम्यान, पहेलगाम हल्ल्यानंतर भारताने ठोस कारवाई केल्यानंतर पाक पुरस्कृत दहशतवादी मोठ्या संख्येने भारताच्या विविध भागात सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे.

मागील एक महिन्यात भारताने जम्मू काश्मिर प्रदेशासह देशाच्या अन्य प्रांतामध्ये अनेक दहशतवाद्यांना अटक केली असून, काही आतंकवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. आता अहमदाबादमध्ये नव्याने ४ दहशतवाद्यांना अटक झाली आहे.


मो. फईक | जीशान अली

## लोकसभेत २८, राज्यसभेत २९ जुलैला चर्चा

### ऑपरेशन सिंदूर

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २३ :
बिहार मतदार पडताळणीच्या मुद्द्यावरून लोकसभेत गोंधळ झाला. विरोधी पक्षाचे खासदार घोषणाबाजी करत वेलमध्ये आले. त्यांनी काळे कपडे फडकावले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांना शांत राहण्याचे आवाहन केले.

अध्यक्षांनी विरोधी खासदारांना घोषणाबाजी करण्यास मनाई केली आणि म्हणाले, तुम्ही संसदेत रस्त्यावर असल्यासारखे वागू नका. देशातील नागरिक तुमच्याकडे पाहत आहेत. लोकसभेचे कामकाज २० मिनिटे चालले, प्रथम दुपारी १२ वाजेपर्यंत, नंतर दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. विरोधी पक्षाच्या खासदारांनी पुन्हा गोंधळ घातला. यानंतर, दोन्ही सभागृहांचे कामकाज गुरुवार सकाळपर्यंत तहकूब करण्यात आले आहे.


काँग्रेस खासदार प्रियंका गांधी आणि सपा खासदार जया बच्चन यांच्यासह अनेक महिला खासदारांनीही या निषेधात सहभाग घेतला.

भारतात निवडणुका चोरल्या जात आहेत



राहुल गांधी म्हणाले, भारतात निवडणुका चोरल्या जात आहेत. महाराष्ट्रात मॅच फिक्सिंग कसे होते हे आम्ही सर्वांना दाखवून दिले. आम्ही कर्नाटकातील एका लोकसभा जागेची चौकशी केली तिथे मोठ्या प्रमाणात मतांची चोरी आढळली, बिहारमध्ये एसआयआरच्या नावाखाली एससी, एसटी, ओबीसी आणि अल्पसंख्याक बंधू-भगिनींची मते चोरली जात आहेत. आम्ही गप्प बसणार नाही. संसदेपासून रस्त्यांपर्यंत इंडिया आघाडी लोकांच्या हक्कांसाठी लढाई लढेल.

## एकनाथ शिंदेंना फडणवीसांचा झटका

### नगरविकास खात्याच्या निधीवर ठेवणार अंकुश

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगर विकास खात्याबाबत एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार आता नगर विकास खात्याच्या मोठ्या रकमेच्या निधी वितरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंजुरी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

एकनाथ शिंदे यांच्या कामाच्या पद्धतीनुसार आणि सढळ हाताने पैसे खर्च करण्याच्या सवयीला अंकुश लावण्यासाठीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. मात्र या सर्व निर्णयामुळे महा युतीत सर्व आलबेल आहे का? असा प्रश्न देखील उपस्थित होतो आहे.

आगामी काळात राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर नगर विकास आणि ग्राम विकास ही दोन खाती महत्त्वाची मानली जातात. यापैकी ग्रामविकास खाते हे भारतीय जनता पक्षाकडेच आहे. तर नगर विकास खाते हे एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. नगर विकास खात्याच्या माध्यमातूनच विविध योजनांचा पैसा हा आमदार आणि महानगरपालिका, नगर परिषद मधील नगरसेवकांना पुरवला जातो.

मात्र अलीकडच्या काळात या खात्याकडून केवळ शिंदे गटाच्या आमदार आणि नगरसेवकांनाच रसद पुरवली जात असल्याची तक्रार होत होती. या सर्व पार्श्वभूमीवर आता या निधीवर मुख्यमंत्री फडणवीस यांचाही अंकुश असणार आहे.

या निर्णयानुसार आता नगर विकास खात्यात मोठा निधी वाटपासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्वाक्षरी नंतर ती फाईल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जाईल. मुख्यमंत्र्यांनी स्वाक्षरी केल्यानंतरच निधी वितरित केला जाणार आहे.



**फडणवीस आणि शिंदे दिल्ली दौऱ्यावर**

यातच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दिल्ली दौऱ्याला जाणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे दोन्ही नेते जिल्ह्यातील वरिष्ठ नेत्यांची चर्चा करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुतीच्या माध्यमातून एकत्र लढणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी या आधी देखील जाहीर केले होते. मात्र स्थानिक पातळीवर या निर्णयात काही बदल होऊ शकतात. या सर्व पार्श्वभूमीवर या दोन्ही नेत्यांचा हा दिल्ली दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.

## सूरज चव्हाण शरण, सकाळी सुटका

■ वृत्तसंस्था, लातूर, दि. २३ :
छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे पाटील यांना झालेल्या महाराणी नंतर आरोपी असलेले सूरज चव्हाण आणि त्यांच्यासोबतच्या ९ पदाधिकाऱ्यांनी पोलिसांना शरण जाऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आहे. सूरज चव्हाण यांच्यासह नऊ जण लातूरच्या विवेकानंद पोलिस ठाण्यात शरण आले होते. सकाळी त्यांची जामिनावर सुटका देखील करण्यात आली. या सर्व प्रकरणात कमालीची गुप्तता पाळण्यात आल्यामुळे या विषयी पुन्हा एकदा वादंग उठण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मागील दोन दिवसापासून पोलिसांची दोन पथके सूरज चव्हाण यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांच्या शोधात होती. या प्रकरणात ११ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी दोघांना पोलिसांनी कालच ताब्यात घेतले होते. तर सूरज चव्हाण आणि इतर ९ आरोपी मध्यरात्री पोलिसांना शरण आले. पोलिसांनी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली. त्यानंतर सकाळी त्यांना जामीन देखील मंजूर झाला आहे.

## उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीची शक्यता

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली,दि.२३ :
ऑगस्टच्या अखेरीस देशाला नवीन उपराष्ट्रपती मिळू शकतात. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पुढील ७२ तासांत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊ शकतो. निवडणूक आयोगाने बुधवारी सांगितले की, निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. सर्व तयारी पूर्ण झाल्यावर निवडणुकीची अधिकृत घोषणा केली जाईल.

घटनेच्या कलम ३२४ अंतर्गत उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. जगदीप धनखड यांनी २१ जुलैच्या रात्री अचानक देशाच्या १४ व्या उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला. ७४ वर्षीय धनखड यांचा कार्यकाळ १० ऑगस्ट २०२७ पर्यंत होता.

निवडणूक आयोगाने एका प्रेस नोटमध्ये म्हटले आहे की - नवीन उपराष्ट्रपती पदाची निवडणूक 'राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणूक कायदा, १९५२' आणि 'राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणूक नियम, १९७४' नुसार होईल.

## हनी ट्रॅपमध्ये ५० मंत्री

### विजय वडेट्टीवार यांचा गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
महाराष्ट्रात सुरू असलेला हनीट्रॅपचा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी विधिमंडळात देखील मुद्दा उपस्थित केला होता.



यावर विजय वडेट्टीवार यांनी देखील मोठा दावा केला आहे. या प्रकरणात अनेक लोक अडकले आहेत, कोणत्याही पक्षाचा माणूस असो त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे, असेही वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

वडेट्टीवार म्हणाले, हनीट्रॅपचे खूप मोठे रॅकेट आहे. त्यात अनेक मोठे मासे अडकले आहेत. साधारण ५० तरी मंत्री आणि अधिकारी यात अडकले आहेत. हनी ट्रॅपमध्ये मोठे अधिकारी, मंत्री, राजकारणातले अनेक आजी-माजी मंत्री यामध्ये आहेत.

ज्यांचे नाव पुढे आले तो लोढा याने अनेकांकडून पैसे घेतले आहेत. त्याने किमान २०० कोटींची वसूली केली असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. तसेच तो कोणाचा कार्यकर्ता आहे हे मी बोलणार नाही. पण या सगळ्या प्रकरणाचा खुलासा लवकर होईल. जे झाकलेले चेहरे आहेत ते समोर येतील, असेही त्यांनी म्हटले आहे.

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी गेल्या आठवड्यात विधानसभेत मंत्रालय, नाशिक आणि ठाणे हे हनीट्रॅपचे केंद्र असल्याचा आरोप केला होता. तसेच या प्रकरणातील पेनड्राइव्ह देखील त्यांनी सभागृहात दाखवले होते. विधानसभा अध्यक्षांना हनीट्रॅपच्या मुद्द्यावर निवेदन करण्यास सांगितले, पण त्यांच्या सुचनेनंतरही सरकारने निवेदन केले नाही. ना हनी ना ट्रॅप, आमच्यापर्यंत नाना पटोलेंचे बॉम्ब पोहोचलेच नाहीत, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी खिल्ली उडवली होती. आता विजय वडेट्टीवार यांनी देखील हा मुद्दा उपस्थित केला आहे.

सुरज चव्हाणने ज्या छावा कार्यकत्यार्ला मारले त्याच्यावर कारवाई करताना पोलिसांना वेळ लागत आहे. सुरज चव्हाणने जे केले त्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री समर्थन करत आहेत, असा याचा अर्थ होतो. अशा प्रकारच्या कृतीला समर्थन आहे का ते मुख्यमंत्र्यांनी सांगावे किंवा सुरज चव्हाणला अटक करावी, अशी मागणी देखील वडेट्टीवार यांनी केली आहे.

या सरकारला थोडी जरी लाज शरम असेल तर माणिकराव कोकाटेंवर कारवाई होईल. शेतकऱ्यांना आणि सरकारला भिकारी म्हणणाऱ्या, सभागृहात रमी खेळणाऱ्या माणसावर कारवाई केली जाईल. माणिकराव कोकाटेंना एक मिनिटही त्या पदावर ठेवू नये अशी आमची मागणी आहे.

सरकारला शेतकऱ्यांबाबत प्रेम, कळवळा असेल तर त्यांनी त्वरित कारवाई केली पाहिजे अशीही मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली.

या सरकारला शेतकऱ्यांच्या भावनांशी देणं घेणं नाही, असे वक्तव्य करणाऱ्या कृषी मंत्राला पाठीशी घालणार आहे का? रमी खेळणारा मंत्री कृषी मंत्री आहे असं आम्ही सांगू का? असा संतप्त सवाल हि विजय वडेट्टीवार यांनी केला. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या वक्तव्यावर ते बोलत होते.

### जस्टिस वर्मा केसमधून सीजेआय गवई हटले

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २३ :
सरन्यायाधीश बीआर गवई यांनी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या रोख घोटाळ्याच्या सुनावणीपासून स्वतःला वेगळे केले आहे. बुधवारी झालेल्या सुनावणीदरम्यान ते म्हणाले, 'या खटल्याच्या सुनावणीत सहभागी होणे माझ्यासाठी योग्य ठरणार नाही, कारण मी यापूर्वीही याचा भाग होतो.'

खरं तर, १९ जुलै रोजी न्यायमूर्ती वर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यामध्ये त्यांनी इन-हाऊस कमिटीचा अहवाल आणि महाभियोगाची शिफारस रद्द करण्याची विनंती केली होती. अहवालात, न्यायमूर्ती वर्मा यांना घरात रोख रक्कम सापडल्याच्या प्रकरणात दोषी ठरवण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती वर्मा यांच्या वतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला.

## ग्वाल्हेरमध्ये कारने कावडधारींना चिरडले, चौघांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, लातूर, दि. २३ :
ग्वाल्हेरमधील आग्रा-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या कडेला चालणाऱ्या कावडधारींना एका कारने चिरडले. त्यानंतर कार उलटली.

अपघातात तीन कावडधारींचा जागीच मृत्यू झाला, तर एका जखमीचा रुग्णालयात मृत्यू झाला. दोघांची प्रकृती गंभीर आहे. मृतांपैकी तिघे एकाच कुटुंबातील आहेत.

मंगळवारी रात्री १ वाजता राष्ट्रीय महामार्गाच्या शिवपुरी लिंक रोडवरील शीतला माता मंदिर गेटजवळ हा अपघात झाला. अपघातानंतर कावडधारी कारसह रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात पडले.

कंपू, जनकगंज, झांसी रोड, माधोगंज पोलिस ठाण्याचे पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि सर्वांना खड्ड्यातून बाहेर काढले आणि जेएएच ट्रॉमा सेंटरमध्ये नेले. डॉक्टरांनी तीन कावडधारींना मृत घोषित केले.

सीएसपी हीना खान म्हणाल्या की, गाडी खूप वेगाने जात होती. यादरम्यान, टायर फुटल्याने ती अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि भाविकांना चिरडून महामागार्खालील झुडपात उलटली. पोलिस पोहोचले तेव्हा गाडीत कोणीही आढळले नाही. गाडीतील लोकांचा शोध घेतला जात आहे.

या अपघातात पुरण बंजारा, रमेश बंजारा, दिनेश बंजारा आणि धर्मेंद्र उर्फ छोटू रा. घाटीगाव यांचा मृत्यू झाला.

### इंडिगोच्या विमानाला उड्डाणापूर्वी आग



■ वृत्तसंस्था
अहमदाबाद, दि. २३ :
बुधवारी अहमदाबादहून दीवला जाणाऱ्या इंडिगोच्या ATR76 विमानाच्या इंजिनमध्ये उड्डाणापूर्वी आग लागली.

विमानात ६० प्रवासी होते. विमान धावपट्टीवर उड्डाण घेण्याच्या तयारीत असताना, वैमानिकाने एअर ट्रॅफिक कंट्रोल (एटीसी) ला आपत्कालीन 'मेडे' कॉल पाठवला आणि उड्डाण रद्द करण्यात आले. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. यानंतर सर्व प्रवाशांना तातडीने सुरक्षित बाहेर काढण्यात आले. घटनेचा तपास सुरू आहे.

याच्या एक दिवस आधी, मंगळवारी, हाँगकाँगहून येणारे एअर इंडियाचे फ्लाइट ३१५ दिल्ली विमानतळावर उतरल्यानंतर लगेचच ऑक्झिलरी पॉवर युनिट मध्ये आग लागली. सहाय्यक पॉवर युनिट विमानाच्या मागील बाजूस, त्याच्या शेपटीत स्थित आहे. तेथे आग लागल्यास विमानाच्या शरीराचे नुकसान होऊ शकते.

## पत्रकारांना पुन्हा रेल्वे सवलत लागू करा : व्हाईस ऑफ मीडियाची मागणी

### खासदार अमर काळे यांचे रेल्वेमंत्र्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २३ :
कोरोना काळाआधी अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना रेल्वे प्रवासावर मिळणारी ४० टक्के सवलत पुन्हा पूर्ववत सुरू करावी, अशी ठाम मागणी व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेने केली आहे.

या मागणीसाठी वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर शरदराव काले यांनी केंद्र सरकारकडे विशेष पुढाकार घेतला असून, केंद्रीय रेल्वे, संचार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांची नवी दिल्लीत भेट घेऊन अधिकृत निवेदन त्यांना सादर केले.

या निवेदनात म्हटले आहे की, कोरोनापूर्व काळात अधिस्वीकृती धारक पत्रकारांना पत्रकार परिषद, शासकीय बैठक, कार्यक्रम अथवा निमंत्रणासाठी प्रवास करताना रेल्वे तिकिटांवर ४० टक्क्यांपर्यंत सवलत मिळत असे. मात्र, कोविडनंतर ही सुविधा थांबवण्यात आली असून, अद्याप ती पुन्हा सुरू करण्यात आलेली नाही.



पत्रकारांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या कार्यसुलभतेसाठी ही सवलत पुन्हा लागू करणे आवश्यक आहे.

पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ आहेत. शासन आणि जनतेमधील संवादाचा पूल म्हणून ते कार्य करतात. अशा पत्रकारांसाठी सरकारने पूर्वीप्रमाणेच रेल्वे प्रवास सवलत लागू करावी, अशी आग्रही मागणी या वेळी करण्यात आली.

व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या या निवेदनामुळे पत्रकारांच्या प्रश्नांकडे पुन्हा एकदा केंद्र सरकारचे लक्ष वेधले गेले आहे.

# अनधिकृत जैन मंदिर पाडणारे आयुक्त नवनाथ घाडगे यांची बढती



**मुंबई :** विलेपार्ले पूर्व परिसरातील कांबळीवाडी परिसरात असलेले अनधिकृत जैन मंदिर मुंबई महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त नवनाथ घाडगे यांच्या आदेशानंतर पाडण्यात आले होते. त्यामुळे राज्यभरातील जैन समुदाय संतप्त झाला होता. त्यानंतर समाजाने मुंबईमध्ये मोठा मोर्चा देखील काढला. अखेर समाजाच्या वतीने टाकण्यात आलेल्या दबावानंतर महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त नवनाथ घाडगे यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. मात्र, आता त्यांना बढती देण्यात आली आहे.जैन समुदायाच्या वतीने प्रचंड दबाव निर्माण करत या विरोधात मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर या संदभार्तील याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. अखेर न्यायालयाने जैन मंदिराचे अनधिकृत बांधकाम पाडण्याच्या कारवाईला योग्य ठरवले होते. त्यानंतर आता प्रशासनाने नवनाथ घाडगे यांची पदोन्नती केली आहे.

# डान्सबार चालवणारे गृहमंत्री महाराष्ट्राला नको : अंजली दमानिया



**मुंबई :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सावली बारची पाहणी करत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर निशाणा साधला. डान्सबार चालवणारे गृहमंत्री महाराष्ट्राला नको, अशा शब्दात त्यांनी कदम यांच्या राजीनाम्याची मागणी देखील केली आहे. गृह राज्यमंत्री यांच्या आईच्या नावाने बारचा परवाना असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. सावली बार प्रकरणांमध्ये आता गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सावली बार मध्ये जाऊन बारची पाहणी केली. कारवाई झाल्यानंतर हा बार बंद करण्यात आला आहे. या बारमध्ये काही चुकीचे होत नव्हते तर बार बंद ठेवण्याची वेळ का आली? असा प्रति प्रश्न दमानिया यांनी विचारला आहे. या संदर्भात आपण सर्व कागदपत्रांची पाहणी केल्यानंतरच बोलणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. आज या बार आणि परिसराची पाहणी केली असता या ठिकाणी डान्सबार होता, असेच दिसून आले आहे. या संदर्भात आपण या एफआआयची पूर्ण कॉपी वाचलेली आहे. म्हणूनच आपण पोलिस अधिकाऱ्यांची देखील भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# सुरक्षा उपाय योजनांकडे दुर्लक्षामुळे दोन मजुरांचा मृत्यू

**मालेगाव :** विहिरीचे काम करत असताना दोन परप्रांतीय मजुरांचा बुडून मृत्यू झाला. मालेगाव तालुक्यातील कुकाणे शिवारात ही घटना घडली. संबंधित ठेकेदाराकडून सुरक्षा उपाय योजनांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे दोघा मजुरांना जीव गमवावा लागल्याचा आरोप करण्यात येत आहे. पोटाची खळगी भरावी, या हेतूने विहीर खोदकाम व बांधकाम करण्यासाठी आलेल्या परप्रांतीय मजुरांच्या जिवाचे मोल किती नगण्य आहे, याची या घटनेच्या निमित्ताने प्रचिती आली. बजरंगपुरी गोसावी (४५) आणि सवारीपुरी गोसावी (४५) असे मृत्युमुखी पडलेल्या मजुरांची नावे असून ते दोघेही राजस्थानातील टिकऱ्या (तालुका चोमू,जयपूर) येथील रहिवासी होते. कुकाणे शिवारात निवृत्ती देवरे यांचे शेत आहे. शेतात सुमारे ३५ फूट खोल विहीर आहे. विहिरीत माती पडू नये म्हणून देवरे यांनी विहिरीभोवती सिमेंट काँक्रीटच्या रिंगा टाकण्याचे काम राजस्थानमधील ठेकेदारास दिले.

# महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राला गौरवशाली इतिहास

## सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे गौरवोद्गार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :




महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राला गौरवशाली इतिहास आहे. देशाच्या सहकार क्षेत्रात महाराष्ट्राचा ६० टक्के वाटा आहे. महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीमध्ये या सहकारी संस्थाचा मोलाचा वाटा आहे. आंतरराष्ट्रीय सहकारीता वर्षानिमित्त सहकार क्षेत्रातील उत्कृष्टरित्या काम केलेल्या संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सत्कार हा अत्यंत चांगला उपक्रम असल्याचे गौरवोद्गार सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी काढले.

यशवंतराव चव्हाण सेंटर येथे दि.महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनतर्फे २६ वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर बोलत होते.यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी, दि.महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष भाऊ कड, उपाध्यक्ष प्रंचित पोरेड्डीवार, सह मुख्य कार्यकारी अधिकारी विजय शंकरराव घोणसे यासह राज्यातील विविध सहकारी बँकाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले की,सहकाराच्या माध्यमातून साखर उद्योग सह शेतीला पूरक विकास झालेला आहे.सहकार क्षेत्रातील अनेक संस्थांनी अत्यंत उत्कृष्टरित्या काम केलेले आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी अनेक सहकारी संस्था काम करत आहेत ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. अनेक संस्था शेतकऱ्यांसाठी शेती भवनची निर्मिती, शेतकऱ्यांच्या मुलांसाठी विविध उपक्रम राबवत आहेत हे कौतुकास्पद आहे. चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिल्यामुळे समाजोपयोगी कामे होत राहतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार क्षेत्राला बळकटी मिळत आहे.

यावेळी सन २०२३-२४ चे कै.विष्णु अण्णा पाटील जीवन गौरव पुरस्कार, सुशीलादेवी देशमुख स्मृती महिला पुरस्कार(संपूर्ण महाराष्ट्र), सहकार महर्षी कै.बाळासाहेब घुईखेडकर उदयोन्मुख तरुण सहकारी कार्यकारी पुरस्कार(संपूर्ण महाराष्ट्र), कै.वैकुंठभाई मेहता उत्कृष्ट जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पुरस्कार, राजमाता जिजाऊ उत्कृष्ट महिला सहकारी बँक, लोकनेत कै.राजारामबापू पाटील उत्कृष्ट शेड्युल/मल्टी स्टेट नागरी सहकारी बँक पुरस्कार, पदभूषण कै.वसंतदादा उत्कृष्ठ नागरी सहकारी बँक पुरस्कार, १०० कोटी रुपए पर्यंत ठेवी असलेल्या बँका, १०० ते २५० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँका, २५० ते ५०० कोटी रूपयापर्यंत ठेवी असलेल्या बँका, ५०० ते १००० कोटी रूपयापर्यंत ठेवी असलेल्या बँका, १००० कोटी ते १५०० कोटी रूपयापर्यंत ठेवी असलेल्या बँका, पगारदार नोकरांची नागरी सहकारी बँक पुरस्कार, शतकोत्तर वाटचाल-विशेष सन्मान, कै.बाबुरावजी देशमुख उत्कृष्ट सहकारी बँक कर्मचारी पुरस्कार दि.महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई, नामदार कै.भाईसाहेब सावंत स्मृती उत्कृष्ट जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्मचारी पुरस्कार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, कै.बापुरावजी देशमुख उत्कृष्ट नागरी सहकारी बँक कर्मचारी पुरस्कार, नागरी सहकारी बँका या पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

# लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २३ :

महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार करून ती गर्भवती राहिल्यानंतर तिच्या न कळतच तिच्या आवडत्या खाण्याच्या पदार्थामध्ये गर्भपाताचे औषध मिसळून तिचा गर्भपात घडवून आणल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी एकाला खडकी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. विनय सुनिल खिल्लारे उर्फ मोनु (३२, पुणे) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका ३८ वर्षीय महिलेनी खडकी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. हा प्रकार ऑक्टोबर २०२४ ते एप्रिल २०२५ दरम्यान घडला. तरूणीने तिच्या तक्रारीत आरोपीने औषध मिक्स करून गर्भपात घडवून आणल्याचे म्हटले आहे. पुढील तपास खडकी पोलिस करत आहेत.

तरूणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दिव्यांगांसाठी मोफत कृत्रिम अवयव शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २३ :

भारत विकास परिषद, शिवाजीनगर शाखा आणि दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या 3 ऑगस्ट, 2025 (रविवार) रोजी कोथरुड (नळस्टॉप जवळ, पाडळे पॅलेस समोर) येथील केंद्राच्या आवारात दिव्यांगांसाठी मोफत कृत्रिम अत्याधुनिक अवयव प्रदान शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती केंद्रप्रमुख विनय खटावकर व शिवाजीनगर शाखेचे अध्यक्ष निलेश गोरे यांनी दिली. या शिबिरासाठी आर्थिक सहायता करणाऱ्या मिलन रायजादा फाउंडेशनच्या संस्थापिका पूनम डाके यावेळी उपस्थित होत्या.

यावेळी माहिती देताना खटावकर म्हणाले की, भारत विकास परिषदेच्या दिव्यांग पुनर्वसन केंद्राने एप्रिल,2025 मध्ये एकाच शिबिरात 892 दिव्यांगांना कृत्रिम पाय मोफत बसवून जागतिक विक्रम केला असून त्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली आहे. अत्याधुनिक कृत्रिम मॉड्युलर पायाची बाजारातील किंमत 50 हजार व कृत्रिम हाताची किंमत 25 हजार रुपयांपर्यंत आहे. दिव्यांगांना कोणतेही निकष लावले जात नाहीत, सुरुवातीला माप घेवून, मेडिकल चेकअप करुन त्यानुसार कृत्रिम हात, पाय लावण्यात येतात.

# बेस्टने कंत्राट रद्द केलेल्या १०० बसगाड्या आणिक आगरात धूळखात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :

बेस्ट प्रशासनाने सेवेतील हलगर्जीपणामुळे कंत्राट रद्द केलेल्या कंपनीच्या जवळपास १०० बसगाड्या बेस्ट उपक्रमाच्या वडाळा येथील आणिक आगारात धूळखात पडल्या आहेत. गेल्या एक ते दीड वर्षांपासून उभ्या असलेल्या या बसगाड्या झुडपांनी पूर्णपणे वेढल्या गेल्या आहेत. कंत्राटदार कंपनीकडे बेस्टची देणी शिल्लक असून हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. दरम्यान, आगारात उभ्या असलेल्या बसगाड्यांची लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

अपुऱ्या बसगाड्यांमुळे मुंबईकरांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी बेस्ट उपक्रमाने डिसेंबर २०२१ मध्ये एका कंपनीला २७५ बसगाड्यांचे कंत्राट दिले होते. मात्र, कंत्राटदार कंपनीने कंत्राटातील अटी शर्तीची पूर्तता केली नाही. सेवा पुरवण्यात सातत्याने हलगर्जीपणा होत असल्याने बेस्ट उपक्रमाने वारंवार कंत्राटदार कंपनीला नोटीस बजावल्या. मात्र, सेवेमध्ये सुधारणा न झाल्याने बेस्ट प्रशासनाने संबंधित कंपनीबरोबर केलेले कंत्राट २०२२ मध्ये रद्द केले. कंत्राटातील २७५ पैकी १७५ गाड्या कंत्राटदार कंपनी घेऊन गेली. मात्र, उर्वरित १०० गाड्या वडाळ्यातील आणिक आगारात उभ्या आहेत. तसेच, कंत्राटदार कंपनीही तोट्यात गेल्याने अखेर त्यांनी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे कर्जबाजारी झाल्याचे जाहीर केले. या कंपनीला बसगाड्या घेण्यासाठी ज्या बॅंकांनी किंवा आर्थिक संस्थांनी मदत केली होती त्यांनी कंपनीविरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. याप्रकरणी समापकाची (लिक्वीडेटर) नेमणूक करण्यात आली आहे. दरम्यान, आणिक आगारात उभ्या असलेल्या बसगाड्यांची लिलाव प्रक्रिया पार पडल्याचे एका सूत्राने सांगितले.

बेस्ट उपक्रमाकडे सद्यस्थितीत स्वतःच्या मालकीच्या ४३०, तर भाडेतत्त्वावरील २६०० अशा एकूण ३०३० बस आहेत. बेस्टमधून दरदिवशी प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या सुमारे २५-२६ लाख असल्यामुळे त्या गाड्या अपुऱ्या पडत आहेत. परिणामी, प्रवाशांना रांगेत ताटकळत बसची वाट पाहावी लागत आहे. सकाळी आणि सायंकाळी गर्दीने तुडुंब भरलेल्या बसमधून प्रवास करताना प्रवाशांचे प्रचंड हाल होतात. त्यामुळे बेस्ट प्रशासनाने नवीन बसगाड्या खरेदी कराव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

# परभणी, बीड, लातूर, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. २३ :



भारतीय हवामान विभागाने कोकण, विदर्भ आणि मराठवाड्याच्या अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. पुढील 24 ते 48 तासांत या भागांमध्ये पावसाचा जोर अधिक वाढण्याची शक्यता असून, काही जिल्ह्यांमध्ये यलो व ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

पुढील 24 तासात बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होत आहे. त्याचा प्रभाव कोकण भागात दिसणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. त्यामुळे ठाणे, मुंबई आणि पालघर जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट तर रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. तर 25 तारखेला ठाणे, मुंबई आणि पालघर साठी येलो तर रायगड आणि रत्नागिरी साठी रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर मध्य महाराष्ट्रात पुणे सातारा जिल्ह्यांना रेड अलर्ट देण्यात आला आहे.

कोकण - रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे आणि मुंबईमध्ये पावसाचा जोर अधिक राहणार आहे.

महाराष्ट्रात मान्सूनने जोर पकडल्याने कोकण, विदर्भ आणि मराठवाड्याच्या अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यातील काही जिल्ह्यांसाठी 'हाय अलर्ट' जारी केला असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोकण किनारपट्टी, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड, लातूर, बीड, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग आणि पालघर या जिल्ह्यांना विशेष सावधगिरीचा इशारा दिला गेला आहे.

कोकण विभागात जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, किनारी भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याचा धोका हवामान खात्याने व्यक्त केला आहे. मच्छीमारांनी समुद्रात न जाण्याचा सल्ला दिला आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या भागात जोरदार वाऱ्यांसोबत पावसाची शक्यता असल्याने, स्थानिक प्रशासन सतर्क आहे.

विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये मागील काही दिवसांपासून मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नद्यांचे पाणीपातळी धोक्याच्या स्तरावर असून, काही भागात नदी-नाल्यांनी पूर ओसंडून वाहायला सुरुवात केली आहे. काही गावांमध्ये घरात पाणी शिरल्याच्या घटना घडल्या असून, स्थानिक प्रशासनाने मदतकार्य सुरू केले आहे.

# आश्रमशाळेत ८ वर्षांच्या मुलाचा खून

■ महासागर प्रतिनिधी
जालना, दि. २३ :

19 तासांपूर्वी संपूर्ण राज्यात धक्का बसवणारी घटना जालना जिल्ह्यात समोर आली आहे. भोकरदन येथील गणपती विद्यालय निवासी आश्रमशाळेच्या वसतिगृहात, किरकोळ वादातून 8 वर्षांच्या बालवीर पवार या विद्यार्थ्याचा गळा आवळून खून करण्यात आल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, ही क्रूर कृत्य वसतिगृहात राहणाऱ्या दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून करण्यात आल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

ही घटना मध्यरात्री 12 वाजण्याच्या सुमारास घडली. प्राथमिक माहितीनुसार, खेळताना झालेल्या किरकोळ वादातून या दोन अल्पवयीन मुलांनी दोरीने बालवीरचा गळा आवळून त्याचा जीव घेतला. 8 आणि 13 वर्षे वय असलेल्या या दोन विधी संघर्ष बालकांना भोकरदन पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी दिली आहे.

# धनकवडीत टोळक्याची दहशत

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २३ :

**१८ वाहनांची तोडफोड**

धनकवडी भागात मध्यरात्री टोळक्याने दहशत माजवून १८ वाहनांची तोडफोड केली. टोळक्याने कोयते, दांडकी उगारून दहशत माजविली. त्यांना रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन रहिवाशांवर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आले. शहर परिसरात आठवडाभरात वाहन तोडफोडीच्या तीन घटना घडल्या आहेत. हडपसरमधील रामटेकडी, भवानी पेठ, तसेच कोंढवा भागात तोडफोडीच्या घटना घडल्या होत्या. धनकवडीतील तोडफोड प्रकरणी सहकारनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पसार झालेल्या तीन आरोपींचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती सहकारनगर पोलिसांनी दिली. धनकवडीत केशव कॉम्प्लेक्स, सरस्वती चौक, तसेच नवनाथनगर भागात टोळके आरडाओरडा करत दुचाकीवरून आले. शिवीगाळ करून टोळक्याने दहशत माजविली.

# मोठ्या गणेश मूर्तींचे समुद्रात विसर्जन

## राज्य शासनाचे मुंबई उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३ :



पर्यावरणाचा समतोल राखत विशिष्ट उंचीच्या घरगुती गणेशाच्या मूर्ती कृत्रिम तलावात, तर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मोठ्या मूर्ती या परंपरागत समुद्रात विसर्जन करण्यात येतील व पर्यावरणाबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे प्रतिज्ञापत्र आज शासने मुंबई उच्च न्यायालयात सादर केले. सरकारच्या या कृतीमुळे मोठ्या गणेशमूर्तींचे समुद्रात विसर्जन करण्याचा मार्ग खूला होणार आहे.

पीओपीवरील बंदीमुळे लाखो मूतीकांराच्या रोजगार बुडण्याची भीती निर्माण झाली होती. यामुळे या व्यवसायाचे अर्थकारण अडचणीत येणार म्हणून राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी राज्याच्या राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोगाला अभ्यास करण्याची विनंती केली होती. या आयोगाने डॉ अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट स्थापन करुन पीओपी व त्यामुळे पर्यावरणावर होणारे परिणाम याचा अभ्यास करुन काही शिफारशी व सूचाना शासनाला केल्या होत्या.

हा अहवाल केंद्रीय पर्यावरण विभागाने न्यायालयात मांडल्यानंतर न्यायालयाने पीओपी वापरावरील घालण्यात आलेली बंदी उठवली होती. तसेच मोठ्या गणेशमूर्ती कुठे विसर्जन करणार? याबाबत राज्य शासनाला प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले होते. शासनाने डॉ. काकोडकर यांच्या समितीचा आधार घेत मोठ्या मूर्ती विसर्जनासाठीचा अभ्यास करुन आज मुंबई उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे व न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर आज ही सुनावणी झाली. राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी राज्य सरकारचे धोरण सादर केले.

दरम्यान, विशेषतः मुंबईतील मानाचे आणि मोठ्या गणेश मूर्तींच्या समुद्रात विसर्जनाबाबत परंपरेचा सन्मान राखत विसर्जन होईल अशी भूमिका शासनाने मांडली आहे. पर्यावरणीय समतोल लक्षात घेऊन मर्यादित उंचीच्या सर्वात जास्त संख्या असलेल्या घरगुती व लहान मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था पूर्वीप्रमाणेच राहणार आहे. मुंबईच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची शंभर वर्षाहून अधिक मोठी परंपरा असून त्यामध्ये बाधा न आणता उत्सव व गणेशमूर्ती विसर्जन ही संपूर्ण परंपरा अखंड राहील व पर्यावरणाच्या दृष्टीने जागृत राहून काही उपाययोजना ही केल्या जातील अशी भूमिका शासनाने घेतली आहे. आज न्यायालयाने भी भूमिका ऐकून घेतली आहे. उद्या पुन्हा यावर सुनावणी होणार आहे.

# भांडूपमध्ये दरड कोसळली

**मुंबई :** गेले दोन दिवस सतत कोसळत असलेल्या पावसामुळे भांडूपच्या खिंडीपाडा परिसरात दरड कोसळली. मंगळवारी संध्याकाळी या दरडीचा काही भाग कोसळला व त्यासोबत काही घरेही कोसळली. तर बुधवारी सकाळी ११.१५ च्या सुमारास आणखी माती खचल्यामुळे काही घरे मातीबरोबर खाली आली. सुदैवाने या दुर्घटनेत जीवितहानी झाली नाही. भांडूप पश्चिमेकडील खिंडीपाडा परिसरात मंगळवारी संध्याकाळी अचानक दरड कोसळली. ओमेगा शाळेच्या समोर असलेल्या साई निकेतन गृहनिर्माण संस्थेत ही घटना घडली. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे दरड कोसळली. पावसाळ्यात दरड कोसळण्याचा धोका असल्यामुळे आधीच या परिसरातील घरे रिकामी करण्याकरीता मुंबई महापालिका नोटीस बजावत असते. मंगळवारी दरडीचा भाग कोसळला तेव्हा सुमारे चार घरे खचली. तर बुधवारी आणखी दोन रिकामी घरे कोसळल्याली.

मुंबईत निसरड्या डोंगर उतारावर वसलेल्या झोपड्यांमध्ये अनेक कुटुंबे जीव मुठीत घेऊन राहत आहेत. दरवर्षी पावसाळ्यात या झोपड्यांवर दरड कोसळण्याचा धोका असतो. यापैकी काही ठिकाणे अतिधोकादायक आहेत. दरड कोसळण्याची शक्यता असलेली सर्वाधिक ठिकाणे पूर्व उपनगरात आहेत.

# व्यावसायिक गोपालनानेच शेतकरी समृद्ध....

## "२२ जुलै शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन" निमित्त विशेष लेख!

या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता व्यावसायिक दृष्टिकोनातून पशुधनाचे काटेकोर पालन पोषण आणि एकंदरीत आहार, प्रजोत्पादन, निवारा व दैनंदिन नियोजन केल्यास साधारणपणे प्रतिदिवशी किमान दहा लिटर दुग्धोत्पादन करणाऱ्या पशुधनापासून कोरडवाहू पद्धतीत एक एकर हंगामी पिकापासून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिक आर्थिक प्राप्ती होते हे विविध अभ्यासातून देखील सिद्ध झाले आहे. मात्र असे असताना देखील व्यावसायिक दृष्टिकोनातून पशुधनाचे व्यवस्थापन आजही सर्वसामान्य बाब नाही, ज्याची खऱ्या अर्थाने शाश्वत ग्राम विकासासाठी गरज आहे. केंद्र तथा राज्य शासनाने देखील शेती व्यवसायाला शाश्वत करण्यासाठी पशुधनाच्या समर्थ साथीचा पुरस्कारच केला आहे व त्यातूनच पशुसंवर्धनासाठी विविध योजनांची अंमलबजावणी होताना दिसत आहे.

याहूनही पुढे जात आपल्या देशातील जातिवंत गोवंशांची उत्पादकता (दुग्धोत्पादनासाठी चांगला गोवंश, शेतकामासाठी बैल, प्रज्योत्पादनासाठी शुद्ध जातिवंत वळू, पटासाठीचे बैल आदी) तसेच इतर उपपदार्थ (शेण, गोमूत्र) आदींचे महत्त्व विचारात घेत गाईला कामधेनू संबोधण्यात येते. असे असतांना देखील दिवसेंदिवस घटत जाणारी देशी गोवंशांची संख्या ग्रामीण अर्थव्यवस्थे साठी निश्चितच चिंतनीय आहे. अर्थात संकरित गाईंच्या तुलनेत देशी गोवंशाची कमी दुग्धत्पादन क्षमता व प्रजनन क्षमतेसोबतच सामूहिक चराई पद्धतीचे परिणाम स्वरूप जातिवंत गोवंशाचे झपाट्याने होत असलेले गावरानीकरण (सामूहिक चराई पद्धतीमध्ये खांडामध्ये उपलब्ध निश्चित वंश माहिती नसलेल्या वळू पासून जातिवंत गोवंशाला होणारी गर्भधारणा व त्यातून पुढे निर्माण होणारा पिढी दर पिढी जिचा निश्चित वंश सांगता येत नाही त्यांना आपण गावरान गाय असा शब्दप्रयोग वापरतो त्याअर्थी) कारणीभूत असावे असे वाटते. मात्र आता महाराष्ट्र राज्याच्या कृषी,पशुसंवर्धन, दुग्ध- व्यवसाय विकास व मत्स्य-व्यवसाय विभागाने आपल्या राज्यात दरवर्षी "22 जुलै" हा दिवस "शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन" म्हणून साजरा करण्याचा अतिशय महत्त्वाकांक्षी आणि तितकाच प्रेरणादायी निर्णय घेतला आहे. या अंतर्गत आपल्या



भाग - २

राज्यातील देशी गाईंच्या संख्येत घट होण्याची कारणमीमांसा विचारात घेऊन देशी गायींच्या संख्येत वाढ करण्याबरोबरच त्यांची उत्पादनक्षमता व प्रजनन क्षमता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे त्याचबरोबर देशी गाईंच्या संवर्धनाचे महत्त्व तसेच पशुजन्य उत्पादनांचे महत्त्व ग्राहकांना पटवून देऊन देशी गाय पशुपालकांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, देशी गाय व गाईपासून मिळणाऱ्या उत्पादनांचे महत्त्व व आवश्यकता विषद करणारी विविध चर्चासत्रे, प्रदर्शने, शिबिरे, स्पर्धा आदींचे आयोजन करीत देशी गोवंश यांचे जतन आणि संवर्धन लोकं चळवळ म्हणून अंगीकारण्याचे नियोजन आहे ज्यात आपण सर्वजण सहभागी आहोत.

### आता व्यावसायिक दृष्टिकोनातून गोपालन म्हणजे नक्की काय करायचे

आपल्याकडे उपलब्ध गोवंशाचे (ज्याचा निश्चित वंश माहिती नाही) ग्रेडिंग अप - म्हणजेच शुद्ध जातिवंत वळू पासून नैसर्गिक रित्या अथवा कृत्रिम रेतनाचे माध्यमातून आपल्याकडील गावरान अथवा जातिवंत गोवंशाला गर्भधारणा करणे व त्यातून जातिवंत पिढीची निर्मिती साकारणे शक्य होईल.

सामूहिक चराई पद्धतीत हल्ली जनावरांना पोटभर चारा आणि पाणी देखील उपलब्ध होत नाही सोबतच खंडातील उपलब्ध गावरान वळू पासून गर्भधारणा होत आपल्याकडील गोवंशाचे गावरानीकरण होत प्रज्योत्पादन व दुग्धोत्पादन दोन्हींवरती विपरीत परिणाम होत आहे त्यामुळे जनावरांना मोकळ्या पद्धतीच्या गोठ्यातच ठेवावे. पशुधनाला बंदिस्त गोठ्यात बांधून ठेवण्याऐवजी मोकळ्या पद्धतीचा हवेशीर गोठा ज्यामध्ये चारा आणि पाण्याची तसेच जनावरांना मुक्त फिरण्याची व्यवस्था उपलब्ध आहे अशा ठिकाणी ठेवावे. सकस दुग्धोत्पादनासाठी पशुधनाला शारीरिक वजन तथा दुग्धोत्पादनाचा एकत्रित विचार करून प्रक्रियायुक्त कोरडा चारा, हिरवा चारा तथा पशुखाद्य योग्य प्रमाणात देणे गरजेचे आहे. सामूहिक पद्धतीने गाव पातळीवर गाईंचे होस्टेल उभारून व्यावसायिक दृष्टिकोनातून फायदेशीर दुग्ध व्यवसाय शक्य आहे. गाव पातळीवरच ओलिताची सोय उपलब्ध असणाऱ्या शेतकऱ्यांनी वैरण उत्पादन करून गावातच दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्यास दोघांचाही फायदा होईल. बाजारात उपलब्ध असलेली सरकीची ढेप (जीला डी-ऑइल केक म्हणतात ज्यामध्ये तेलाचे अजिबात प्रमाण नाही) देण्याऐवजी घरच्या घरी तयार केलेलं अथवा बाजारात उपलब्ध चांगल्या प्रतीचे पशुखाद्य द्यावे. दुधाचा व्यवसाय खरं म्हणजे सकाळी सात वाजेच्या आत आणि सायंकाळी सात वाजेनंतर चा व्यवसाय आहे हे लक्षात घेऊन दिवसभर शेती व्यवसाय सांभाळत सहजतेने पशुपालन करावे. पशुधनाचे गोठ्यातील मलमूत्र तथा चाऱ्याचे अवशेष सावलीत अर्धवट कुजवून त्यामध्ये 30 ते 40% इतर पालापाचोळा मिसळून शास्त्रीय पद्धतीने गांडूळ खत निर्मिती केल्यास दुधासोबतच गांडूळ खत विक्री मधून अधिक अर्थार्जन होईल व गावातील जमिनींचे आरोग्य देखील सुधारेल. खरे नामनिष्कामही ग्रामसेवा!

झटू सर्व भावे करून स्वर्ग गावा!!
कळू हे वळो दे देह कार्य पडो दे!
घडोदे प्रभू एवढेच घडो दे!!

या राष्ट्र संतांच्या संकल्पनेतील सर्वांग सुंदर संपन्न ग्रामनिर्मितीसाठी आपण एकत्रित प्रयत्नांची मोट बांधूया हाच संकल्प आजची दिनी करू.

**डॉ. किशोर बिडवे**
जनसंपर्क अधिकारी
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

## छेडछाडप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**आर्णी:** तालुक्यातील जवळा येथील दोन युवक शालेय विद्यार्थिनींची नेहमी छेडछाड करून मानसिक त्रास देत होते. या त्रासाला कंटाळून तसेच मानसिक खचून १९ जुलै रोजी रात्री उशीरा एका विद्यार्थिनीने कीटकनाशक प्रशासन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. माहिती मिळताच नजीकच्या लोकांनी तिला तातडीने आर्णी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याप्रकरणी पीडित विद्यार्थिनींच्या आईने आर्णी पोलिस स्टेशनला फिर्याद दिली. त्यावरून तुषार गेडाम व संघर्ष कोसे या दोघाजणांविरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, दोघांनाही अटक करण्यात आली आहे. सदर मुलीवर उपचार सुरू असून तिच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या प्रकरणाचा अधिक तपास ठाणेदार निलेश सुरटकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक नरेंद्र देशमुख करीत आहेत.

# विभागांनी अनुकंपा नियुक्तीची कारवाई कालमर्यादेत करावी–पालकमंत्री राठोड

**▪ भरतीच्या अनुषंगाने नियुक्ती प्राधिकाऱ्यांची बैठक**
**▪ अनुकंपा भरतीचा 150 दिवस विशेष मोहिमेत समावेश**

**यवतमाळ, दि.२३, महासागर प्रतिनिधी:** राज्य शासनाने १५० दिवसांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्तीची कालमर्यादा निश्चित करून दिली आहे. विभागांनी या मर्यादेत अनुकंपा पदे निश्चित करून वेळेत पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री संजय राठोड यांनी सर्व विभागांना दिले आहे. राज्य शासनाच्या १५० दिवस विशेष कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र असलेल्या सर्व उमेदवारांना कालमर्यादेत नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे. जिल्ह्यात जास्तीत जास्त अनुकंपा उमेदवारांना नियुक्ती देण्यासाठी आवश्यक कार्यवाही वेळेत करण्याच्या सूचना



पालकमंत्र्यांनी केल्या.अनुकंपा नियुक्तीसाठी शासनाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार अनुकंपा उमेदवारांची प्रतिक्षा सूची अद्ययावत करणे, उमेदवारांच्या विनंतीनुसार गट बदलण्याची कार्यवाही, अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध रिक्त पदांची परिगणना, गट ड मध्ये अनुकंपा नियुक्तीसाठी पदे पुनर्जिवित करण्याचे प्रस्ताव सादर करावयाचे आहे. ही सर्व प्रक्रिया दि.१५ ऑगस्ट पर्यंत पुर्ण करावयाची आहे. दि.१८ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी याबाबत बैठक घेऊन अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध पदे व नियुक्तीच्या अनुषंगाने माहिती घेणार आहे. त्यानंतर जिल्ह्याची गट क ची सामायिक प्रतिक्षासूची अद्ययावत केली जातील. तसेच नियुक्तीस उपलब्ध पदसंख्या प्रसिद्ध करण्यात येतील. नियुक्त प्राधिकाऱ्याच्या यादीप्रमाणे गट ड च्या पदावर नियुक्तीसाठी सिफारस केली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या सिफारसीनुसार गट ड ची मृत करण्यात आलेली पदे नियुक्ती देण्यासाठी पुनर्जीवित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतील. ही प्रक्रिया दि.२२ ऑगस्ट पुर्वी पुर्ण करण्यात येणार आहे.अनुकंपा




**जिल्हाधिकाऱ्यांकडून अनुकंपा भरतीचा आढावा**
शासनाने अनुकंपा नियुक्तीसाठी निर्धारीत केलेला कालबद्ध कार्यक्रम व पालकमंत्री संजय राठोड यांच्या निर्देशान्वये प्रभारी जिल्हाधिकारी अनिल खंडागळे यांनी सर्व नियुक्ती प्राधिकारी तथा विभाग प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी अनिरूद्ध बक्षी, पालकमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी मोहन जोशी उपस्थित होते. शासनाने जो कालबद्ध कार्यक्रम दिला आहे. त्याप्रमाणे कारवाई करून पुढील बैठकीत आपल्या विभागाची माहिती सादर करण्याच्या सूचना श्री.खंडागळे यांनी केल्या.

उमेदवारांचा दि.१ सप्टेंबर रोजी मेळावा घेण्यात येणार आहे. त्यात उमेदवारांची नियुक्तीसाठी सिफारस करण्यात येतील. त्यापुर्वी विभागाच्यावतीने गट ड ची मृत पदे पुनर्जीवित करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येणार आहे. १५ सप्टेंबर रोजी गट क च्या व पुनर्जीवित केल्या गट ड च्या सिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे. याप्रमाणे शासनाने निर्धारीत केल्याप्रमाणे विभागाने कारवाई करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या आहे.

# लाखात विकले विधवा महिलेला, दोन वर्षे केले शोषण





**यवतमाळ, दि.२३, महासागर प्रतिनिधी:** पती आणि एका मुलाच्या अकस्मात निधनानंतर विधवा महिलेचा तिच्या सासरच्या लोकांनी एक लाख वीस हजार रुपयांमध्ये सौदा केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या सौद्यामध्ये विधवा महिलेला सासरच्या लोकांनी गुजरातमधील एका व्यक्तीला विकलं. या व्यक्तीनं विधवा महिलेचं लग्नाच्या नावाखाली दोन वर्षे शारीरिक आणि मानसिक शोषण केलं. दरम्यान तिच्यापासून मूल झाल्यानंतर त्यानं महिलेला तिच्या गावी सोडलं. पोलीस बेपत्ता व्यक्तींचा शोध घेत असताना हा धक्कादायक प्रकार समोर आला. सध्या महिला तिचा बेपत्ता मुलगा आणि मुलीचा शोध घेण्याची विनंती करत आहे. आर्णी पोलीस स्टेशन हद्दीतील एका महिलेच्या पती आणि एका मुलाचा अकस्मात मृत्यू झाला होता. परिस्थिती हलाकीची असल्यामुळं दुसरा मुलगा आणि मुलीसह ती सासरी राहात होती. या निराधार महिलेच्या अवस्थेचा गैरफायदा घेऊन तिला रोजगार मिळवून देतो, असं सांगून तिची नणंद आणि नणंदेच्या पतीने तिला मध्य प्रदेशात नेलं. तिथं त्यांनी विधवा महिलेला एक लाख वीस हजार रुपयांत गुजरात मधल्या एका व्यक्तीला विकलं. त्या व्यक्तीनं विधवा महिलेचं तब्बल दोन वर्ष शारीरिक आणि मानसिक शोषण केलं. पुत्रप्राप्तीनंतर त्यानं या महिलेला गावात सोडलं. आर्णी पोलिसांनी बेपत्ता लोकांसाठी सुरू केलेल्या शोध मोहिमेतून हा धक्कादायक प्रकार उघड झाला. या महिलेचा एक मुलगा आणि मुलीचा अद्याप पत्ता लागलेला नाही. त्यांना शोधून द्यावं, अशी मागणी महिलेनं केली आहे. २०२३ मध्ये मुलगी आणि नातवंडं बेपत्ता आहेत, अशी तक्रार पीडित महिलेच्या आई-वडिलांनी पोलिसांत केली होती. आर्णी पोलीस बेपत्ता महिलेचा शोध घेत असताना त्यांना ही महिला गावीच असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी महिलेकडे चौकशी केली असता हा धक्कादायक प्रकार पुढं आला. याप्रकरणी पोलिसांनी तिची सासू, सासरे, दीर नणंद आणि ननंदेचा नवरा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

महिला आणि मुलींच्या असहायतेचा आणि अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांची विक्री करण्याचे अनेक प्रकार यवतमाळ जिल्ह्यात घडल्याची चर्चा आहे. याप्रकरणी कडक उपाययोजना आखण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे. २०२३ ला दीर, सासू, सासरा आणि मध्य प्रदेशमध्ये राहणाऱ्या नणंद, नंदोई यांनी संगममतानं गुजरातमधील एका व्यक्तीला विकलं.

हा सौदा एक लाख वीस हजार रुपयांत झाला होता. त्यापैकी ८० हजार रुपये पीडित महिलेच्या समोर नणंद आणि नंदोई यांना देण्यात आले. यानंतर दोन वर्षे गुजरातमधील व्यक्तीनं तिचं शारीरिक शोषण केलं. यातून तिला मुल झालं. २०२३ साली महिला बेपत्ता असल्याची नोंद इथं झाली होती. या महिलेचा शोध घेत असताना या सर्व बाबी लक्षात आल्या. महिलेच्या तक्रारीवरून विविध कलमांनुसार चार जणांविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांना ताब्यात घेतलं आहे. याप्रकरणाचा आर्णी पोलीस तपास करीत आहे.

## पांढरकवड्यातील समस्या निवारणार्थ उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**पांढरकवडा, दि.२३, महासागर प्रतिनिधी:** शहरात अनेक समस्या निर्माण झाल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले. या समस्यावर उपाय योजना करण्यासाठी प्रशासनाने पुढे यावे असे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. या बाबत लवकर तोडगा न निघाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. शहरात डेंगू मलेरिया व इतर आजाराची साथ सुरू आहे शहरामध्ये विविध ठिकाणी एम डी ड्रग्स, चिडीमारी, घरफोडी व चोरी, अल्पवयीन मुले त्यामध्ये व्यसनाधीन होत आहे. शहरांमध्ये साफसफाई नाही. या सर्व विषयावर चर्चा साठी बैठक आयोजित करावी अशी मागणी टायगर फोर्सचे अध्यक्ष मदन जिद्देवार यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. अमलीपदार्थ व्यवसाय कोणाच्या मर्जीने सुरू होते, या संदर्भात तर्कवितर्क लढविले जात आहे. यासाठी पोलिस प्रशासनासह शासनाचे विविध विभाग तसेच सामान्य नागरिकांनी जागृत राहण्याची सामाजिक जबाबदारी व्यक्त करण्यात येत आहे.

मुख्य रस्ता जोडणारी गल्ली अतिक्रमण हटवण्यात यावे

महाविद्यालय,व शिकवणी वर्ग परिसर येथे सीसीटीव्ही बसविणे सर्व समस्याचे निवारण संबंधित विभागाला निर्देश देऊन समस्या निकाली काढावे अशी मागणी केली आहे.

## कर्जमुक्तीसह विविध समस्यांविरूध्द आज चक्काजाम

**यवतमाळ,दि.२३, महासागर प्रतिनिधी:** शेतकरी कष्टकरी कामगार यांच्यासाठी अहोरात्र काम करणारे सामाजिक क्षेत्रातील सर्व मान्यवर तसेच राजकीय क्षेत्रातील व विविध संघटनेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणाऱ्या सर्वांनी, शेतकरी बापासाठी उद्या २४ जुलै रोजी होणा-या चक्काजाम आंदोलनात सर्वांनी एकत्र येणे अत्यंत गरजेचे आहे. त्याकरिता उद्या गुरुवारी सकाळी ११ वाजता. यवमाळच्या बसस्थानक चौकात होणा-या शेतकरी कर्जमाफी संदर्भात चक्काजाम आंदोलन करण्यात येत आहे. सर्वानी हजर राहवे असे आवाहन प्रहार संघटनेचे बिपिन चौधरी,मनसेचे देवा शिवरामवार यांनी पत्रकार परिषदेतून केले आहे.

## शहर पोलिसांनी पकडला अडीच लाखाचा सुगंधी तंबाखू

**यवतमाळ, दि.२३, महासागर प्रतिनिधी:** येथील नागपूर बायपास रोडवर हिरो शोरूम च्या बाजूला असलेल्या ताडीया नगर हजरत बाबा सय्यद समसुद्दीन कादरी दरबारच्या समोर राहत असलेले रोहित हेमनानी वय वर्षे ३५ यांनी राज्य शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधीत तंबाखू आपल्याजवळ बाळगून विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी या ठिकाणी धाड टाकून दोन लाख ४० हजार ३७० रुपयांचा गुटखा जप्त केला आहे यासंदर्भात शहर पोलिसांनी सांगितले की, रोहित हेमनानी यांनी शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधी तंबाखूजन्य पदार्थ स्वतःजवळ ठेवून त्याची विक्री करीत होता याबाबतची माहिती पोलिसांच्या डीपी पथकाला मिळताच त्यांनी त्या ठिकाणी जाऊन धाड घातली आणि सुगंधीत तंबाखू ताब्यात घेतला ही कारवाई रात्री नऊ वाजता च्या दरम्यान करण्यात आली याबाबतचा गुन्हा रात्री बारा वाजता दाखल करण्यात आला.

## आज शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी महागावात रास्तारोको



**महागाव, दि.२३, महासागर प्रतिनिधी:** बच्चु कडू यांच्या मागण्या मान्य होण्यासाठी उद्या दिनांक २४ जुलाई रोजी शेतकरी बांधवांच्या न्याय हक्कासाठी व त्यांचा सातबारा कोरा करावा, शेतीमालाला हमीभाव द्यावे, दिव्यांग बांधवांची मानधन सहा हजार रुपये करण्यात यावे व इतर मागण्यांना घेऊन महाराष्ट्रभर चक्काजाम आंदोलन होणार असून सदर आंदोलनाच्या पार्श्वभूमी महागाव बायपास येथे मातोश्री विद्यालय तुळजापूर नागपूर हायवे रोडवर छत्रपती संभाजी महाराज चौक या ठिकाणी उद्या सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत सर्व संघटना सर्व पक्षाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात ऐणार आहे. आंदोलनासाठी सर्व पक्ष व संघटनेतील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी, दिव्यांगांनी उपस्थित राहील असे निवेदन ठाणेदारांना दिले. यावेळी एड. पवन धरणकर, प्रा. शरदचंद्र डोंगरे,डीबी नाईक,प्रमोद जाधव,गणेश ठाकरे, संदीप ठाकरे,अमृतराव देशमुख व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अहिल्यादेवी होळकरांचा अपमान करणाऱ्यावर कारवाईची मागणी



**ढाणकी, दि.२३, महासागर प्रतिनिधी:** समाजात आदर आणि श्रद्धा असणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याबद्दल सुनील नामक इसमाने आपल्या फेसबुक अकाउंटवरून अत्यंत अपमानास्पद भाषेत बदनामीकारक अपशब्द लिहिल्यामुळे समाजात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता आहे.

अशा प्रकारचे वक्तव्य केवळ कायद्याचे उल्लंघन करणारे नसून, सामाजिक शांततेस आणि एकात्मतेस देखील धोका पोहोचवणारे आहे.संबधित फेसबुक पोस्ट/कमेंटची चौकशी करून, आवश्यक त्या कायदेशीर तरतुदींनुसार सुनील गोपाळराव उभे याच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी जय मल्हार संघटना ढाणकी यांनी पोलीस स्टेशन, बिटरगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## गंभीर गुन्ह्यातील आरोपींचा पेट्रोल पंपावर राडा



**बाभूळगाव,दि.२३, महासागर प्रतिनिधी:** येथील रहिवाशि तथा जमानतीवर सुटलेल्या सराईत गुन्हेगाराने कळंब रोड वरील पेट्रोल पंपावर चाकुच्या जोरावर पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांशी वाद घातला, धमकी दिली व दोन वाहनांमध्ये पेट्रोल व डिझेल भरल्यानंतर पैसे दिले नाही. विदर्भाचा डॉन असल्याचे सांगून निघून गेला. दोन आरोपींच्या अवघ्या काही तासातच पोलीसांनी मुसक्या आळल्या आहे.वैभव उर्फ जहरीला अंबादास जांभुळकर राहणार बाभूळगाव याच्या शिरावर पोलीस दप्तरी गंभीर स्वरूपाचे १५ गुन्हे दाखल आहे. अलीकडेच त्याने एक महिन्यापूर्वी येथील शिवछत्रपती चौकाततील घरावर हल्ला करून घराच्या खिडकीच्या काचा फोडल्या व घरासमोर ठेवून असलेल्या चार चाकी वाहनाच्या काचा फोडल्या पती, पत्नी भीती पोटी दार बंद करून घरात लपून बसल्याने मोठी घटना टळली . त्या प्रकरणात पोलिसांनी त्याला अटक करून पोलीस कस्टडी रिमांड घेतला. त्या नंतर त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालय परिसरात येण्यावर बंदी घालून सोबत काही अटीवर न्यायालयाने त्याची जमानतीवर सुटका केली होती. आता त्याने काल कळंब रस्त्यावरील पेट्रोल पंपावर दुपारी चार वाजता एका दुचाकीत १,२१०/- रुपयांचे पेट्रोल भरले व मला ओळखत नाही काय? मी विदर्भाचा डॉन आहे. अशी धमकी देऊन पेट्रोलचे पैसे न देता निघून गेला. त्यानंतर तोच आरोपी जहरीला रात्री आठ वाजता त्याच पेट्रोल पंपावर चार चाकी वाहन घेऊन आला. पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्याच्या गळ्याला चाकू लावून डिझेल टँक फुल करण्याचे सांगितले ४,४१०/- रुपयाचे डिझेल भरून झाल्या नंतर डिझेलचे पैसे दिले नाही. तू आम्हाला पैसे मागतो काय? ओळखत नाही काय? तुझ्या मालकाला आमचे नाव सांग तो समजून जाईल. पैसे मागशील तर पैसे मागण्या सारखा ठेवणार नाही. अशी धमकी दिली असे तक्रारीत नमूद केले आहे. सदर पेट्रोल पंप यवतमाळ येथील रहिवाशि एडवोकेट घनश्याम अत्रे यांच्या मालकीचा आहे.या गंभीर स्वरूपाच्या तक्रारीवरून बाभूळगाव पोलिसांनी वैभव उर्फ जहरीला अंबादास जांभुळकर व कुणाल चौरे दोघेही राहणार बाभूळगाव यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता ३०९ (४), ३५१ (२), ३५१( ३ ), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करुन अटक केली आहे.

## पोलिस असल्याची बतावणी करून शेतकऱ्याला लुटले



**आर्णी, दि.२३, महासागर प्रतिनिधी:** नागपूर-तूळजापूर महामार्गावरील उड्डान पुलाजवळ शेतात पीक पाहणी करणाऱ्या शेतकऱ्याला आम्ही पोलिस अधिकारी आहो, असे सांगून शेतकऱ्याचा ३८ हजार ९५० रूपयांचा सोन्याचा मुद्देमाल घेऊन दोन भामटे दुचाकीने पसार झाले. ही घटना सोमवारी (ता. २१) जवळा येथे घडली.

या प्रकरणी भारत बैस (रा. जवळा) यांच्या तक्रारीवरुन दोन अज्ञात आरोपींविरोधात मंगळवारी (ता. २२) आर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भारत बैस (वय ६५) हे जवळ्याहून स्कुटीने त्यांच्या आर्णी रोडवरील शेतात चक्कर मारण्यासाठी गेले होते. शेताची पाहणी करीत असताना दोन अनोळखी व्यक्ती मोटरसायकल घेऊन आले व भारत बैस यांच्याजवळ थांबून त्याने गळ्यात व हातात सोन्याची चैन व अंगठी का घातली आहे, आम्ही पोलिस अधिकारी आहोत, असे म्हणून त्यांच्याकडील दागिने काढून त्यांच्याकडील रुमाल व कागदात बांधून बैस यांना परत दिली व ते दुचाकीने निघून गेले.

बैस यांनी नंतर ती पुडी उघडून पाहली असता त्यातील सोन्याची चैन, अंगठी हे सर्व गायब होते. एकूण वजन १० ग्रॅम वजनाचे सोने किंमत २६ हजार ५०० रुपये एक ४ ग्रॅम ५१० मिलीग्रॅम वजनाची अंगठी, तसेच एक साधी पितळी अंगठी किंमत अंदाजे २०० रुपये असा एकूण ३८ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल मोटरसायकल घेऊन आलेल्या इसमांनी लांबविले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी दुसऱ्या दिवशी आर्णी पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पीएसआय प्रशांत देशमुख करीत आहेत.

## जगन्नाथ नागभिडकर यांचे निधन



**यवतमाळ, दि.२३, महासागर प्रतिनिधी:** मुळचे वणी येथील निवासी असलेले आणि सध्या यवतमाळ येथे असलेले जगन्नाथ शिवराम नागभिडकर यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी बुधवार दि. २३ जुलै रोजी दुपारी ४.३० वाजताच्या दरम्यान वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर पांढरकवडा मार्गावरील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. अंत्ययात्रा गुरूवार दि. २४ जुलै रोजी दुपारी १ वाजता लक्ष्मी रेसीडेन्सी, महादेव मंदीरा जवळ येथील निवास स्थानावरुन निघणार आहे. जगन्नाथ नागभिडकर हे डॉ. प्रिया नागभीडकर (येडशीकर) यांचे वडील आहे. त्यांच्या पश्चात चार मुली, एक मुलगा असा आप्त परिवार आहे.

## जिल्ह्यामध्ये मोतिबिंदू मुक्त विशेष मोहिमेची सुरुवात



**यवतमाळ,दि.२३, महासागर प्रतिनिधी:** आरोग्य विभागामार्फत दि.२२ जुलै ते २२ ऑगस्ट या कालावधीत मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र ही विशेष मोहिम राज्यात राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील नागरीकांना मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतिबिंदू नेत्र शस्त्रक्रिया उपलब्ध करुन देण्यात येत आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यामध्ये या मोहिमेचे उद्घाटन दि.२२ जुलै रोजी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुखदेव राठोड, जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. मनोज तगलपल्लेवार, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. प्रशांत चव्हाण, नेत्रतज्ञ डॉ. स्मिता चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी उपस्थित सर्व रुग्णांना मोतिबिंदू आजार तसेच डोळ्यांच्या इतर आजाराविषयी माहिती देण्यात आली. मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र योजना यशस्वी करण्यासाठी ४० वर्षावरील सर्व जनतेची नेत्रतपासणी तसेच ज्यांना डोळ्यांचे इतर आजार आहेत, अशा सर्वांनी आपले नेत्र तपासणी प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय तसेच महिला व बाल रुग्णालयातील नेत्र विभाग येथे जावून करुन घ्यावी, असे आव्हाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांनी केले आहे.

**मेतिबिंदू एक सामान्य पण दुर्लक्षित होणारा आजार** : मेतिबिंदू हा डोळयांतील लेन्स (भिंग) अस्पष्ट होण्याचा एक आजार आहे. ज्यामुळे दृष्टी मंद होते, धुसर दिसते किंवा संध्याकाळी स्पष्ट दिसत नाही. हा आजार विशेषतः हा वृध्द वयात अधिक आढळतो. पण काही वेळेस डोळयाला इजा झाल्यास, मधुमेह, दिर्घकाळ औषधोपचार किंवा अनुवंशिक आजारामुळे सुध्दा होऊ शकतो.

**मोतिबिंदूची लक्षणे** : अस्पष्ट किंवा धुसर दृष्टी, रात्री दिसण्यास अडचण, चष्म्याच्या नंबरमध्ये वारंवार बदल होणे, रंगाची स्पष्टता कमी होणे, डोळ्यांच्या बाहूलीचा रंग करडा, पांढरा होणे ही आहेत. मोतिबिंदूवर कोणतेही औषध किंवा चष्मा कायमचा उपाय नाही. मोतिबिंदूचे एकमेव व प्रभावी उपचार म्हणजे शस्त्रक्रिया करणे. आजकाल आधुनिक तंत्रज्ञानामुळे ही शास्त्रक्रिया अतिशय सुरक्षित, वेदनारहीत आणि काही मिनिटात होणारी आहे. रुग्णांला दुसऱ्या दिवशी घरी जाण्याची मुभा दिली जाते.

मोतिबिंदूवर वेळेवर उपचार न केल्यास दृष्टी पुर्णपणे हरवू शकते. मात्र योग्यवेळी शस्त्रक्रिया केल्यास ती दृष्टी परत येवू शकते. आपल्याला किंवा आपल्या घरातील कोणालाही मोतिबिंदूची लक्षणे जाणवत असतील तर जवळच्या सरकारी आरोग्य केंद्रात तपासणी करुन घ्यावी, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुखदेव राठोड तसेच जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. मनोज तगलपल्लेवार यांनी कळविले आहे.

## भरडधान्य खरेदी नोंदणीत ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**यवतमाळ,दि.२३, महासागर प्रतिनिधी:** रब्बी पणन हंगामात आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत ज्वारी, बाजरी, मका व रागी या भरडधान्य खरेदीसाठी जिल्ह्यात महागाव, पांढरकवडा, झरी, पुसद, आर्णी, राळेगांव, कळंब, घाटंजी व उमरखेड या नऊ तालुक्यात खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. केंद्रावर भरडधान्य खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी करण्याकरीता दि.३१ जुलै पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील खरेदी केंद्रांमध्ये तालुका खरेदी विक्री समिती महागांव, तालुका खरेदी विक्री समिती पांढरकवडा, झरी तालुक्यात बळीराजा फळे फुले भाजीपाला कृषी उत्पादन पणन व प्रक्रिया सहकारी संस्था पाटण, पुसद तालुक्यात किसान मार्केट यार्ड शेलु (बु), पुसद, आर्णी तालुक्यात शेतकरी कृषी खाजगी बाजार दत्तरामपुर, आर्णी, तालुका खरेदी विक्री समिती राळेगांव, तालुका खरेदी विक्री समिती कळंब, तालुका खरेदी विक्री समिती घाटंजी व तालुका खरेदी विक्री समिती उमरखेड या केंद्रांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ज्वारी, बाजरी, मका व रागी खरेदीकरिता ऑनलाईन नोंदणीची मुदत वाढविण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रत्यक्षात भरडधान्य खरेदी आता दि. ३१ जुलैपर्यंत करण्यात येणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे संबंधित खरेदी केंद्रावर देवून भरडधान्य खरेदीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन प्रभारी जिल्हा मार्केटिंग अधिकारी विजय गाढवे,यांनी केले आहे.

# नवीन वेतन व निवृत्तीवेतन सुधारणा अधिनियम २०२५
# सेवानिवृत्तांचे आर्थिक व सामाजिक भविष्य अंधारात!

नोकरीनंतरचा जीवनकाल हा आर्थिकदृष्ट्या अनिश्चित असतो. उत्पन्नाचे स्रोत बंद झाल्यानंतरही दैनंदिन गरजा, वैद्यकीय खर्च आणि जीवनमान टिकवण्यासाठी आर्थिक आधार आवश्यक असतो. यासाठीच निवृत्तीवेतन योजना ही एक महत्वाची सामाजिक व आर्थिक सुरक्षा प्रदान करणारी यंत्रणा आहे. परंतु अचानक सरकारने मार्च २०२५ मध्ये केंद्र सरकारने मंजूर केलेल्या नवीन वेतन आणि निवृत्तीवेतन सुधारणा अधिनियम, २०२५ अंतर्गत देशातील सर्व सेवानिवृत्त केंद्र व राज्य सरकारी सेवकांना आगामी वेतन आयोगाच्या लाभांपासून वगळण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे लाखो निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक सन्मानावर घाला येऊन हा कायदा प्रत्यक्ष अर्थाने 'काळा कायदा' ठरत आहे. विशेषतः शिक्षक, प्राध्यापक, लघुवर्गीय कर्मचारी, प्रशासकीय अधिकारी यांच्यासाठी हा निर्णय जणू निवृत्तीनंतरच्या सन्मानासमोर राज्यप्रणीत अपमान ठरत आहे.

-------------

यामागील कारण एकतर त्यांना रिटायर्ड लोकांबद्दल सहानुभूती नाही, यातील बरेच लोकं असे आहेत जे काँग्रेस च्या काळात नोकरीवर लागले आणि ते काँग्रेसचे मतदार होते पण असे कारण समोर करता येऊ शकत नसल्याने आर्थिक स्थिती नसल्याने हा निर्णय घ्यावा लागत आहे असे कारण समोर येईल. ही आर्थिक परिस्थिती आपोआप निर्माण झाली की चुकीच्या धोरणामुळे निर्माण झाली, हे तपासणे आवश्यक आहे त्याकरिता फक्त मुद्दे लक्षात घेतले तरी बरेच चित्र स्पष्ट होते.

१) गेल्या 10 वर्षात म्हणजे 16.35 लाख कोटी रुपये कर्ज माफ करण्यात आले असल्याचे 18 मार्च 2025 रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर दिले. आहे. त्यात मोजक्या उद्योगपतींचे कर्ज 70%च्या वर आहे. (हे तेच लोकं असतात जे इलेट्रोल बाँड च्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांना त्यातील काही भाग देत असतात.

२) खासदार/आमदार एक टर्म जरी निवडून आला तरी तो आयुष्यभराच्या जगण्याची सोय करून ठेवतो, हे काही लपलेले नाही, अर्थात याला निवडक अपवाद आहेतच.

पण एकच व्यक्ती तीन/चार वेळेस निवडून आला तर त्याला चार पेंशन देणे हे न समजण्यासारखे गणित आहे. एकीकडे आर्थिक तरतुदी करून नोकऱ्या, सरकारी कंपनी वाढवणे, शैक्षणिक दर्जा सुधारणे, प्रवासी वाहतूक सुधारणे, आरोग्य सुविधा वाढवणे अशा अनेक मागण्या सातत्याने होत असताना त्यांना दुर्लक्षित करून न मागता लाडकी बहीण योजना अंमलात आणणे आणि काही सत्ताधाऱ्यांनी ती निवडणुकीसाठी आणली होती, हे कबुल करणे अत्यंत चुकीचे धोरण आहे.

फक्त सरकारने रोड बांधले आणि त्यावर टोल टॅक्स स्वतः वसुल केला तरी बराच निधी सरकार कडे जमा होऊ शकतो. 2019 पासुन कॉर्पोरेट टॅक्स 30 %वरून 22% केल्याने दरवर्षी 1.19लाख कोटी सरकारने आपले उत्पन्न कमी केले. अशा चुकीच्या धोरणामुळे सरकारजवळ मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी आणि पेंशन देण्यासाठी पैसा कमी पडतो, असे का समजू नये?

**वित्त कायदा २०२५ :**

वित्त कायदा २०२५ चा प्रत्यक्ष अर्थ असा की, सरकार आर्थिक वर्षामध्ये कोठून व कसे पैसे उभारते आणि त्याचा कसा वापर करते, यासाठी हा कायदा कायदेशीर चौकट प्रदान करतो. समाजमाध्यमांवर प्रसारित होणा?या काही अपूर्ण माहितीच्या विपरीत, या कायद्यांतर्गत महागाई भत्त्याची वाढ किंवा वेतन आयोगाच्या सुधारणांसह निवृत्तीनंतरचे महत्त्वाचे फायदे मागे घेतलेले नाहीत.

१९७२ चा पेन्शन कायदा आणि १९८३ चा ऐतिहासिक चंद्रचूड निकाल, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या इतर निर्णयांतून पेन्शनधारकांना मिळणारे संरक्षण अद्यापही अबाधित आहे. हे संरक्षण सुनिश्चित करते की, वित्त कायद्यात कोणतेही बदल झाले तरी, पेन्शनधारकांना शेवटच्या पगाराच्या समतुल्य पेन्शन आणि संबंधित लाभ मिळणे चालू राहील.

भविष्यातील पेन्शन किंवा भत्त्यांमध्ये बदल करण्याचा अधिकार सरकारकडे असेल. मात्र, हे बदल पूर्वलक्षी प्रभावाने न होता केवळ संभाव्य प्रभावाने लागू होतील. याचा अर्थ असा की, कोणताही सुधारित निर्णय केवळ त्या निर्णयाच्या तारखेपासूनच लागू होईल, मागे जाऊन त्याचा परिणाम केला जाणार नाही.

**केंद्रीय नागरी सेवा (पेन्शन) नियम २०२१ - नियम ३७ मध्ये सुधारणा-**

पेन्शन आणि पेन्शनधारक कल्याण विभागाने, अर्थ मंत्रालय आणि कार्मिक व प्रशिक्षण विभागाशी सल्लामसलत करून केंद्रीय नागरी सेवा (पेन्शन) नियम २०२१ च्या नियम ३७(२९)(क) मध्ये सुधारणा जाहीर केली आहे.

या सुधारित नियमांतर्गत विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (ढरव) कर्मचाऱ्यांच्या अशा प्रकरणांचा समावेश केला गेला आहे, जिथे सरकारी सेवेतून स्थानांतरित झाल्यानंतर गैरवर्तनामुळे त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले असेल.

नवीन तरतुदीनुसार, जर अशा कर्मचाऱ्याला सेवेत सामावल्यावर गैरवर्तनासाठी बडतर्फ किंवा सेवेतून वगळले गेले, तर सरकारकडून दिल्या गेलेल्या सेवेसाठीचे निवृत्तीवेतन लाभही जप्त केले जाऊ शकतात.

तसेच, सार्वजनिक उपक्रमांतून बडतर्फी, सेवेतून वगळणे किंवा इतर अनुशासनात्मक कारवाईसंबंधी निर्णय संबंधित मंत्रालयाच्या प्रशासकीय पुनरावलोकनाच्या अधीन असतील. याशिवाय, सरकारी कर्मचाऱ्यांवर लागू असलेल्या तरतुदीच या सार्वजनिक उपक्रमातील कर्मचाऱ्यांवरही लागू करण्यात आल्या आहेत.

**वेतन आयोग लाभापासून वंचित आणि न्यायाला पायबंद :**

नवीन कायद्यानुसार, २०२६ साली होणाऱ्या आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसी जुन्या पेन्शनधारकांवर लागू होणार नाहीत. म्हणजेच यापुढे त्यांच्या महागाई भत्त्यांमध्ये वाढ होणार नाही, किंवा त्यांच्या मूलभूत वेतनात कोणतीही सुधारणा केली जाणार नाही.

सरकारी सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झालेल्या लाखो कर्मचाऱ्यांना जगाच्या वाढत्या जीवनखर्चापासून संरक्षण मिळणे अपेक्षित असते. मात्र, या कायद्याने त्यांच्या हातातील निवृत्तिवेतन आणि महागाई भत्त्याचे गणित एकाएकी स्थिर करून टाकले आहे.

**कलम ३०९ अंतर्गत बदल घटनात्मक स्वायत्ततेला गालबोट :**

संविधानातील अनुच्छेद ३०९ नुसार, केंद्र किंवा राज्य शासनाला शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा अटी ठरविण्याचा अधिकार आहे. परंतु, या कायद्यातील तरतुदींनुसार केंद्र सरकारने यापुढे वेतन आयोग गठित करणे ही सक्ती न ठेवता त्याबाबत पूर्ण अधिकार स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

यामुळे दर १० वर्षांनी वेतन आयोग गठित करावा लागेल, ही व्यवस्था नष्ट झाली आहे. याचे दूरगामी परिणाम शासकीय सेवकांच्या वेतन व्यवस्थेवर व त्याच्या एकसंधतेवर होतील.



प्रा. डॉ. प्रशांत विघे
राज्यशास्त्र विषयाचे लेखक
भारतीय महाविद्यालय, अमरावती.
९३२६८७७७४९

**न्यायालयात जाण्यासाठी निर्बंध म्हणजे लोकशाही मूल्यांवर गदा**

नवीन वेतन व निवृत्तीवेतन सुधारणा अधिनियम, २०२५ याकायद्यातील सर्वात गंभीर बाब म्हणजे या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

यामुळे संविधानात दिलेल्या न्याय हक्काच्या संकल्पनेवरच आघात झाला आहे. कोणत्याही कायद्याचा प्रभाव जर नागरिकाच्या मूलभूत हक्कांवर होत असेल, तर त्याविरोधात न्यायालयात जाणे हा त्याचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, या कायद्यात तोच मार्ग बंद करण्यात आला आहे, हे अतिशय धोकादायक लक्षण आहे.

**संपूर्ण नियंत्रण सरकारकडे**

पेन्शन दर, पुनरावलोकन प्रक्रिया, सुधारणा यांसारख्या सर्व बाबींवर सरकारला पूर्ण अधिकार दिले गेले आहेत. यामुळे आधीची पारदर्शक आणि न्यायप्रवण वेतन आयोग प्रणाली हटवून ती प्रशासनाच्या इच्छाधारी निर्णयांवर आधारित करण्यात आली आहे. याचा अर्थ, भविष्यात कोणत्याही बदलासंबंधी सरकारी कर्मचाऱ्यांना अधिकार, भूमिका किंवा विचारविनिमयाची संधी मिळणार नाही.

**कायद्याचे संभाव्य दुष्परिणाम :**

१. ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सेवा, औषधे, विमा, आणि जीवनावश्यक वस्तूंवर होणाऱ्या खर्चासाठी शासनाकडून काहीही आधार मिळणार नाही. महागाई दर प्रचंड वेगाने वाढत असताना स्थिर निवृत्ती वेतन हे आर्थिक असमानतेला अधिक तीव्र करणारे ठरेल.

२. जीवनभर राष्ट्रसेवा करणाऱ्या शिक्षक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, व इतर सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर शासकीय धोरणामुळे वेतनसमानतेपासून वंचित ठेवले जाते, हे अत्यंत लज्जास्पद आणि अमानवी आहे. या निर्णयामुळे सेवानिवृत्त जीवन म्हणजे दुर्लक्षित जीवन हे सामाजिक सन्मानाला तडा असा अर्थ निर्माण होतो.

३. न्यायिक दाद मागण्याचा अधिकार काढून घेणे म्हणजे लोकशाही शासनाच्या पायावर कुऱ्हाड मारणे. ही बाब संपूर्ण समाज व्यवस्थेतील विश्वासाला हादरा देणारी असून लोकशाहीची मानहानी आहे

सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या संघटनेने तीव्र विरोध दर्शवत औरंगाबाद येथे गोविंदभाई श्रॉफ सभागृहात संघटनेची राज्यस्तरीय सहविचार सभा पार पडली. अध्यक्षस्थानी डॉ. एम. ए. वाहूळ तर केंद्रीय सचिव डॉ. जे. एम. मंत्री, कोषाध्यक्ष प्रा. एस. बी. नाफडे, सहसचिव डॉ. रवींद्र बिडकर, तसेच इतर ज्येष्ठ मार्गदर्शक उपस्थित होते.

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी भारतातील पेन्शन संकल्पनेचा इतिहास मांडत सांगितले की, पेन्शन ही कृपा नसून, तो सेवा हक्क असून त्या बदल्यात मिळणारा सन्मान आहे असे विचार व्यक्त केले होते.

हा कायदा घटनाविरोधी व अन्यायकारक असल्यामुळे संपूर्णतः मागे घेतला पाहिजे. संविधानाच्या कलम ३०९ चा आधार घेऊन वेतन आयोगाच्या स्वायत्ततेला बाधा येऊ नये, जुन्या व नवीन पेन्शनधारकांमध्ये भेदभाव न करता सर्वांना समान पद्धतीने लाभ लागू करावेत.

विविध कर्मचाऱ्यांच्या संघटना, शिक्षक संघ, प्राध्यापक संघ, सामाजिक चळवळी आणि विधिज्ञ यांना एकत्र आणून सामूहिक लढा उभारला गेला पाहिजे. या कायद्याविरोधात जनजागृती मोहीम, माध्यमांमधून प्रश्न उपस्थित करणे, निवेदने, जनमत चाचण्या, आंदोलने इ. मार्गांनी संसदेबाहेर आवाज पोहोचवावा शासनावर दबाव निर्माण केला पाहिजे.

नवीन वेतन व निवृत्तीवेतन सुधारणा अधिनियम, २०२५ हा कायदा फक्त आर्थिक लाभ काढून घेणारा नाही, तर तो एका संपूर्ण वर्गाच्या सन्मानावर आणि जगण्याच्या मूल्यांवर गदा आणणारा आहे. जीवनभर सरकारी सेवेत योगदान दिलेल्या लोकांना त्यांच्या निवृत्तीनंतरच्या हक्कांपासून वंचित ठेवणे, हे संविधानिक मूल्यांचं अपमान आहे.

हा कायदा ह्यशासकीय सेवेतील सन्मानास उत्तरार्धात ठेच देतो. त्यामुळे सेवानिवृत्त प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, प्रशासक यांच्यासह सर्व सुजाण नागरिकांनी एकत्र येऊन, संघटीतपणे आवाज उठवणे अत्यंत आवश्यक आहे. हा लढा केवळ पेन्शनसाठी नाही, तर सन्मानपूर्वक जगण्याच्या अधिकारासाठी आहे. संविधान, न्याय, आणि सामाजिक न्याय यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाने या लढ्याशी स्वतःला जोडणे, ही काळाची गरज आहे.

# सच्चे रंगकर्मी जयंत सावरकर!

मराठी चित्रपट आणि नाट्य सृष्टीतील जेष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांचा आज दुसरा स्मृतिदिन. बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे २४ जुलै २०२३ रोजी त्यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले होते.

जवळपास पाच दशकांहून अधिक काळ रंगभूमीवर आपल्या अभिनयाचे रंग भरणाऱ्या जयंत सावरकर यांच्या निधनाने मराठी रंगभूमीची मोठी हानी झाली. त्यांच्या निधनाने रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला.

३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेले जयंत सावरकर हे नोकरीसाठी मुंबईत आले. काही काळ त्यांनी मुंबईत नोकरीही केली मात्र अभिनयाचे बाळकडू पिलेल्या जयंत सावरकर यांचे मन नोकरीत रमले नाही.

नोकरी सोडून ते नाटकात काम करू लागले. नोकरी सोडून त्यांनी नाटकात काम करणे हे त्यांच्या सासऱ्यांना आवडले नाही. जयंत सावरकर मात्र अभिनय करण्यावर ठाम राहिले. रंगभूमीवर त्यांना जी भूमिका मिळत गेली ती त्यांनी निष्ठेने पूर्ण केली.

सुरवातीचे काही वर्ष तर त्यांनी बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणूनच काम केले मात्र आपल्यालाही आपल्या क्षमतेप्रमाणे नाटकात अभिनय करण्याची संधी मिळेल असा विश्वास त्यांना होता याच विश्वासाच्या जोरावर त्यांना भूमिका मिळत गेल्या.

आपल्याला मिळणाऱ्या भूमिकांची लांबी किती मोठी आहे हे त्यांनी कधीही पाहिले नाही. जयंतराव भूमिकेच्या लांबीपेक्षा भूमिकेची रुंदी पाहत म्हणूनच त्यांना काही नाटकात छोट्या भूमिका मिळाल्या. मात्र या छोट्या भूमिकेतही त्यांनी स्वतःच्या अभिनयाची छाप सोडली. त्यामुळे लवकरच मराठी रांगभूमिवरील एक प्रख्यात अभिनेते म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे त्यांना अनेक नाटकात मुख्य भूमिका मिळाल्या त्या भूमिकांचे त्यांनी सोने केले.

एकच प्याला मधील तळीराम, तुझं आहे तुज्यापाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील अंतु बर्वा आणि हरितात्या या त्यांनी केलेल्या भूमिका अजरामर ठरल्या. जुन्या काळातील मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते आजच्या काळातील चंद्रकांत कुलकर्णी, मंगेश कदम यासारख्या सर्वच दिग्दर्शकांच्या दिग्दर्शनात त्यांनी काम केले.

त्यांनी अभिनय केलेले सौजण्याची ऐसीतैशी, टिळक - आगरकर, ययाती - देवयानी, सूर्यास्त ही नाटके खूप गाजली जवळपास १०० हुन अधिक नाटकात भूमिका केलेल्या जयंतरावांनी ३० हुन अधिक मराठी आणि हिंदी चित्रपटात भूमिका केल्या आहेत.

दूरचित्रवाणीवरील काही मालिकातही त्यांनी भूमिका केल्या आहे. नाटक, चित्रपट, मालिका अशा तिन्ही ठिकाणी आपल्या अभिनयाचे रंग भरणारे जयंतराव मात्र प्रेक्षकांना भावले ते नातकातच! सहज सोपा अभिनय करून प्रेक्षकांची मने जिंकण्याची त्यांची खासियत होती म्हणूनच त्यांचा अभिनय पाहताना हा माणूस आपल्या घरातीलच एक व्यक्ती असल्याचा भास प्रेक्षकांना होत असे.

त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेने त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवले आहे. १९९७ साली झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. एक छोटा माणूस या नावाने त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या निधनाने पाच दशकांहून काळ रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला आहे. जेष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर यांना विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# मानव वन्यजीव संघर्ष अतितीव्र होऊ नये



महाराष्ट्रात व्याघ्र पर्यटनासाठी चंद्रपूर जिल्ह्याचे नाव अग्रस्थानी आहे. चंद्रपुर जिल्ह्यातील ताडोबा अभयारण्य व्याघ्र पर्यटनासाठी देशात सुप्रसिद्ध असून ताडोबा अभयारण्यात आजपावतो असंख्य लाखो पर्यटक, सिने अभिनेता, सेलिब्रिटींनी वन भटकंती केली आहे.वाघांच्या संख्येत चंद्रपूर जिल्हा प्रथमस्थानी आहे. चंद्रपूर जिल्हा वाघांचा जिल्हा म्हणून नावलौकिक मिळवत असताना मानव वन्यजीव संघर्षात प्रथमस्थानी येत आहे.

हे इथे ठळकपणे अधोरेखित करावेसे वाटते. नागपूर वन विभागात पेंच, ताडोबा- अंधारी, नवेगांव- नागझिरा व्याघ्र प्रकल्पार्गत गावांमध्ये वाघांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे.

मागील पाच वर्षात एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात १७५ नागरिकांचा थेट वाघाने हल्ला केल्यामुळे बळी गेला. तर चालू २०२५ या वर्षात जानेवारी ते जून या सहा महिन्याच्या काळात तब्बल पंचविस ग्रामस्थांचा नाहक बळी गेला. जिल्ह्यातील वाघाव्दारे मृत्युमुखी पडलेल्या ग्रामस्थांचा मुद्दा विधानसभेतही प्रचंड गाजला आहे.

या घटनेनंतर अनेक आंदोलने झालीत.या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना सत्तर हजारांपासून ते पंचवीस लाखांपर्यंत मदत शासनाकडून कुटुंबीयांना मिळत असते. अलीकडेच वाचण्यात आलेल्या वृत्तानुसार गतवर्षी मानव वन्य प्राण्यांच्या संघर्षात बळी पडलेल्या कुटुंबीयांना मदत देताना गतवर्षी २२० कोटी रुपये एवढी रक्कम मोजावी लागली. जी आतापर्यंतची सर्वाधिक होती.

राज्यातील वन पर्यटन वाढीसाठी करोडो रुपये खर्च करून नवनवे प्रयोग आखले जात आहे.यात गैर नाही .परंतु गत पाच वर्षांपासून मानव आणि वनपरिक्षेत्रालगतच्या गावातील शेतकऱ्यांचे पशुधन वाघ व बिबट्यांच्या हल्ल्याने पछाडलेले आहे. याशिवाय व्याघ्र हल्ल्या सोबतचं तृणभक्षी प्राण्यांमुळे शेतपिकांचे मोठे नुकसान होते. एकीकडे लहरी हवामान, शेतमालाचे ढासळते उत्पन्न, त्यात शेतमालांची आणि पशुधनांची जीवित हानी अश्या चौफेर दृष्टचक्राने वनपरिक्षेत्रा लगतच्या शिवारातील शेतकऱ्यांना ग्रासून काढले आहे.

वन्य प्राण्यांच्या बचावार्थ अनेक गावकरी शेत पिकांच्या बंदोबस्तासाठी तारेचे कुंपण टाकतात. त्यात विद्युत प्रवाह सोडतात. अशांमुळे वन्य प्राण्यांचा प्राण जातो. आज मानव आणि वन्य प्राणी या दोघांचेही संरक्षण करणे गरजेचे आहे.मानव वन्यजीव संघर्षावर अनेक अहवाल प्रतिवर्षी सादर होतात. त्यांच्या शिफारसी वेळीच स्वीकारल्या असत्या तर आज मानव वन्यजीव संघर्षाची तीव्रता सौम्य झाली असती.

अलीकडच्या काळात मानव वन्यजीव संघर्षावर कासवगतीचा उपाय म्हणून वनपरिक्षेत्र व परिसरातील गाव शिवारात कृत्रिम बुद्धिमत्तेवर (ए आय )आधारित कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा ते गोंदियातील नवेगांव बांध पर्यंत सुमारे तीन हजार एकशे पन्नास ए आय कॅमेरे जंगलात बसविण्यात येणार असल्याचे सांगितले जाते. एखादा वाघ किंवा बिबट्या गावं शिवारात किंवा खाजगी जागेत दिसेल, तेव्हा कॅमेरे डिटेक्ट करतील आणि तात्काळ अलार्म वाजेल. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवी जीवितहानी कमी होण्यास हातभार लागेल असा विश्वास व्यक्त करूया.

मानव वन्यजीव संघर्ष केवळ वन वनपरिक्षेत्र सीमेलगतच होत नसून अन्य लघु, मध्यम,नागरी शहरे सुद्धा वाघांच्या हल्ल्याने भयभीत झाली आहे.

राज्यातील अनेक गावात, वाड्यात, वस्त्यांमध्ये बिबट, वाघांचे दर्शन झाल्याचे वृत्त नियमितपणे कानी पडते. अनेकदा पशुधनाचा फडशा पाडतात.ग्रामस्थ गाव शिवारात सायंकाळच्या समयी जाण्यास धजावतात. वनातून तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या हजारो ग्रामस्थांच्या मनात भीतीचे सावट असते. वनपरिक्षेत्रा लगत असलेल्या नागरिकांच्या हितासोबतचं अन्य वन्यप्राणी जे नागरी वस्त्यांकडे कूच करीत आहेत, जे वन अधिवास क्षेत्राच्या बाहेर भटकंती करतात अशा वन्यप्राण्यांद्वारा होणारा धोका तेवढाच कायम असतो.

मुळात ही गंभीर समस्या मानवाच्या अमर्याद स्वार्थापोटी जंगलांचा ऱ्हास करण्याने झालेली आहे. आज जंगलांचा अधिवास कायम राखून अन्नसाखळी कायम ठेवण्यावर भर दिला पाहिजे. तरच भविष्यातील मानव वन्यजीव संघर्ष हा संपुष्टात येईल. याचेही भान काळाच्या ओघात ठेवणे गरजेचे आहे.

# तर्री आलूबोंडा

देशी चण्यांच्या सनान लालभडक मसालेदार तर्रीत आलिशानपणे डुंबणारा गलेलठ्ठ आलुबोंडा बघताक्षणीच वैदर्भीय अंतःकरणाला घळाघळा पाझर फुटल्याशिवाय राहात नाही.

या रुबाबदार आलुबोंडयाला वरून शेवकांद्याचा मुकुट चढवला की ते लोभस रुपडं काही केल्या हॉटेलसमोरून पाय उचलू देत नाही. म्हणूनच आपल्या विदर्भातले आजोबा गुटगुटीत नातवाला मोठ्या लाडाने काहून बे आलुबोंडया ! अशी प्रेमळ विचारणा करतात की नाही?

भगवदगीतेत वर्णिल्याप्रमाणे अगदी मुखं च परिशुष्यते अशी अवस्था झालेल्या गलितगात्र योद्ध्याला सुद्धा आलुबोंडा दाखवला तर त्याच्या तोंडाला पाणी सुटून त्याची हिम्मत वाढेल. पहाटे डायटिंगचा संकल्प करून निघालेल्या फिगर कॉन्शस पब्लिकचा मॉर्निंग वॉक आलुबोंडयाच्या टपरीवर समाप्त होतो. चष्मा घरी विसरले तरी टपरीवर रचून ठेवलेला आलुबोंडयाचा पहाड खूप लांबूनही बरोब्बर दृष्टीला पडतोच.

१२० च्या स्पीडने सुसाट पळणाऱ्या बाईकला करकचून ब्रेक लावण्याची ताकद आहे आलुबोंडयाच्या मायावी सुगंधात महाराजा! प्रारंभी भीत भीत सिंगल आलुबोंडा ऑर्डर करणाऱ्या नवख्या पाहुण्याचा आवाज तो पोटात गेल्यावर एकदम दणदणीत होतो. मग भारदस्तपणे एक और लगाना भाऊ ! अशी दमदार ऑर्डर आपोआप निघते.

याउलट लहान आकाराचा, चपटा, बहिर्वक्र आणि फिकट पिवळा पुणेरी 'बटाटावडा' बघून अशी कुठलीही प्रेरणा विदर्भाच्या पोट्ट्यांना होत नाही. कारण कुठल्याही वयाचे असले तरी पोट्टेशाही जात नाही म्हणून 'पोट्टेच' ते.

तर मंडळी, हा बटाटावडा अत्यंत फिक्कट, निस्तेज आणि ॲनिमिया झालेल्या रुग्णासारखा पावाच्या गादीवर निपचित झोपलेला असतो. स्वतंत्रपणे तर्रीबिर्रित पोहण्याचं त्राणच नसतं बिचाऱ्यात. आधीच मिळमिळीत, वरून सुक्या पावाच्या कुबड्या घेऊन



येणारा हा बटाटावडा कशीबशी गरजू माणसाची भूक शमवत असेलही कदाचित. पण भरपेट जेवलेल्या टग्यांच्याही पोटात भूक उत्पन्न करण्याचं सामर्थ्य त्याच्यात बिलकुल नसतं.

जातिवंत आलुबोंडयाला ब्रेडपावाच्या कुबड्यांची बिलकुल गरज नसते भाऊ ! त्याला पाहिजे असतो लालेलाल तर्रीचा स्विमिंग टॅंक! ज्यांना धारोष्ण तर्री सहन होत नाही, त्यांच्यासाठी आलं लसणाची झणझणीत कढी हा पण एक सुंदर विकल्प असतो.

मात्र साखर घातलेलं गुळचट ताक वगैरे दिसलं की स्वतः आलुबोंडयालाच मळमळल्यासारखं होत असेल. या जीवलग आलुबोंडयाला नको म्हणणारे कॅलरीकॉन्शस पांढरपेशे वरवर नाकं मुरडत असलेत तरी अंतःकरणातून मात्र हळहळत जिभल्या चाटतात. त्यांचा आत्मा कढईभोवती घुटमळत राहतो, असं म्हणतात.

आजकाल मात्र ठिकठिकाणी नाश्त्यासाठी समोश्याचं प्रस्थ बोकाळलेलं आहे. याचं कारण मैदा हा बेसनापेक्षा स्वस्त पडतो आणि समोसा दीर्घकाळ गरम राहतो हे आहे. बहुतांश अड्डयांवर आलुबोण्डे तळण्याची सकाळी एक निश्चित वेळ असते. शौकीन खाऊगुल्ले बरोबर त्यावेळी हजेरी लावतात. त्यांचा 'विदर्भाचा वक्तशीरपणा' अगदी वाखाणण्यासारखा असतो. ठराविक गिऱ्हाइकांसाठी स्टॉक तयार होतोच आणि हाहा म्हणता लंपाससुद्धा होतो. सोल्ड लाईक हॉट केक हा इंग्रजी वाक्प्रचार पण स्लो वाटेल त्या वेगापुढे. मग पुढे दिवसभर त्यांचं समोश्यांचं गुऱ्हाळ चालत राहतं.

आलुबोंडा संपला...हे काळजात चिरा मारणारं कठोर वाक्य कधीकधी कानावर आघात करतंच. अशा बिकट प्रसंगी आजचा आपला दिवस कसा जाईल? याची चिंता त्या भाऊला घेरते. ठरल्या ठिकाणी, ठरल्या वेळी, ठरलेली वस्तु न मिळणं म्हणजे मुहूर्त चुकवल्यासारखं वाटतं त्याला. मग या आकस्मिक मानसिक धक्क्यातून कसाबसा सावरत तो शांतपणे आलुबोण्डा मिळण्याचं दुसरं ठिकाण आठवू लागतो. वेळप्रसंगी लोखंडाचे चणे खाण्याची हिम्मत असणाऱ्या विदर्भाचे भाऊ देशी चण्यातला 'आलुबोंडा' हा मात्र एकदम विक पॉईंट आहे. काही ठिकाणी संध्याकाळी आलुबोंडयांचा दुसरा घाणा काढण्याचा रिवाज आहे.

संध्याकाळी शिफ्ट संपवून बाहेर पडणाऱ्या कामगारांसाठी बहुधा कारखान्यांच्या तोंडावरच हे अड्डे असतात. बघताक्षणीच पोटात दंगल उसळावी अन मन रसाळ रसाळ व्हावं अशीच या गुटगुटीत बाळाची ख्याती आहे. अशाच एका उघड्या टपरीवर, महाकाय कढईत, मावळत्या सूर्यप्रकाशात, खळखळत्या तेलात विहार करणारे चैतन्यमयी सोनेरी आलुबोण्डे माज्या स्मृतीत अजरामर झालेले आहेत.

एक वैदर्भीय खवय्या...



# लो ब्लड प्रेशरच्या रुग्णांनी काय खाव? काय खाऊ नये?

बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यात कमी रक्तदाबाची(लो ब्लड प्रेशर) समस्या अनेकांना उद्भवते, ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये रक्तदाब सामान्यपेक्षा कमी होतो आणि पुरेसा ऑक्सिजन आणि पोषक तत्वे शरीराच्या अवयवांपर्यंत पोहोचू शकत नाहीत.

यामुळे थकवा, चक्कर येणे, अंधुक दृष्टी, आणि हृदयाचे ठोके मंद होणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. जर हे दीर्घकाळ टिकून राहिले तर ते हृदय, किडनी आणि मेंदूसाठी हानिकारक ठरू शकते.

कमी रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे योग्य आहार. अशा रुग्णांनी त्यांच्या आहारात थोड्या प्रमाणात अतिरिक्त मीठ समाविष्ट करावे.

मिठात असलेले सोडियम रक्तदाब वाढविण्यास मदत करते. मात्र लक्षात ठेवा की डॉक्टरांनी परवानगी दिली असेल तरच हे मीठाचे प्रमाण वाढवा. याशिवाय शरीरात पाण्याची कमतरता भासू लागल्यास कमी रक्तदाबाची समस्या निर्माण होऊ शकते, म्हणून भरपूर पाणी प्यावे. नारळ पाणी, ताक, लिंबूपाणी आणि ओआरएस सारखी पेये देखील खूप फायदेशीर आहेत.

**कमी रक्तदाब असल्यास काय खावे?**

आहारतज्ज्ञ सांगतात की, उच्च रक्तदाब असलेल्या लोकांनी लोह, व्हिटॅमिन बी १२ आणि फोलेटयुक्त पदार्थ खावेत कारण ते रक्त निर्मितीस मदत करतात आणि शरीराला ऊर्जा देतात. अंडी, दूध, दही, बदाम, बीट, केळी, डाळिंब, हिरव्या भाज्या आणि मोड आलेले कडधान्य हे फायदेशीर मानले जाणारे पदार्थ आहारात समावेश करावा. दिवसातून ४-५ वेळा कमी प्रमाणात खावे जेणेकरून शरीराला सतत ऊर्जा मिळत राहील.

**मीठाचे सेवन संतुलित पद्धतीने करा :** कमी रक्तदाबाच्या रुग्णांसाठी डॉक्टरांच्या सल्ल्यापेक्षा थोडे जास्त मीठ घेणे फायदेशीर ठरू शकते . कारण मीठात सोडियम भरपूर असते जे रक्तदाब वाढवण्यास मदत करते. परंतु त्याचे प्रमाण मर्यादित आणि डॉक्टरांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार असावे.

**पाणी आणि हायड्रेशन वाढवा :** शरीरात पाण्याची कमतरता असल्यास रक्तदाब आणखी कमी होऊ शकते. दररोज किमान २.५ ते ३ लिटर पाणी प्या. नारळ पाणी, ताक, लिंबूपाणी आणि इलेक्ट्रोलाइट पेये देखील फायदेशीर आहेत.

दिवसातून ४-५ वेळा हलके जेवण करा. यामुळे शरीरात रक्त प्रवाह व्यवस्थित राहतो आणि रक्तदाब अचानक कमी होण्यास प्रतिबंध होतो.

**पोटॅशियम आणि व्हिटॅमिन बी १२ समृद्ध असलेले पदार्थ खा :** अंडी, दूध, दही, केळी, गोड बटाटे, पालक, ब्रोकोली, बदाम आणि राजमा यांसारखे पदार्थ रक्तदाब स्थिर ठेवण्यास मदत करतात.

**कॉफी किंवा ग्रीन टी :** काही प्रकरणांमध्ये कॅफिनमुळे रक्तदाब तात्पुरता वाढू शकतो. सकाळी किंवा दुपारी १ कप कॉफी किंवा ग्रीन टी घेणे फायदेशीर ठरू शकते.

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## विषमुक्त शेती?

विषमुक्त शेती खरच
आहे काळाची गरज
पण ते कसं शक्य
होईल हेच नाही कळत ..

रसायनांचा वापर सोडला
तर उत्पादन घटते
बाजारभाव मात्र
कमीच पदरी पडते ..

शेतकऱ्यांचे अर्थकारण
मात्र सारचं ढासळते
शासन यासाठी सांगा
काय उपाय करते ?

# सर्व अडथळ्यांवर मात करत वोक्हार्ट हॉस्पिटल्सच्या कार्डियाक टीमने दाखवले चमत्कार, ८०% मृत्यूच्या धोका असलेल्या रुग्णाचा जीव वाचवला

**नागपूर, २३ जुलै :** वोक्हार्ट हॉस्पिटल, नागपूर येथे अत्यंत गंभीर वैद्यकीय प्रसंगात, एका रुग्णाला तीव्र हृदयविकाराचा झटका आला होता आणि त्याची मृत्यू होण्याची शक्यता ८०% होती. पण डॉ. अमित सुरेशराव बल्लमवार (कन्सल्टंट इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट) आणि त्यांच्या अनुभवी कार्डिएक टीमने तात्काळ आणि अत्यंत कौशल्याने उपचार करून रुग्णाचे प्राण वाचवले. जो प्रसंग एक दु:खद शेवट ठरू शकला असता, तो आता एका प्रेरणादायक जीवनदानाच्या कहाणीत बदलला आहे.

२ जुलै २०२५ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता, मध्यम वयातील एका पुरुषाला वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये तातडीने दाखल करण्यात आले. सकाळी ५ वाजल्यापासून त्यांच्या छातीत दुखत होते, परंतु सुरुवातीला त्यांनी ते दुर्लक्ष केले. मात्र सकाळी ९ वाजता वेदना असह्य झाल्यावर जवळच्या स्थानिक हॉस्पिटलमध्ये ईसीजी तपासणी केली, ज्यात हार्ट अटॅकचे लक्षणे दिसून आली म्हणून त्यांना पुढील विशेष उपचारासाठी वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले. हृदयरोगाच्या उपचारांमध्ये एक वाक्य प्रसिद्ध आहे टाइम इज मसल म्हणजे प्रत्येक मिनिटाच्या उशीराने हृदयाचे स्नायू अधिक खराब होत जातात.



रुग्णाचे कुटुंब दिल्लीमध्ये होते. डॉ. बल्लमवार यांनी त्यांना लगेच संपर्क करून परिस्थिती किती गंभीर आहे हे समजावून सांगितले: तत्काळ उपचार केले नाहीत तर रुग्ण वाचणार नाही. कुटुंब दिल्लीमध्ये असतानाही त्यांनी टीमवर विश्वास ठेवला आणि कोणतीही उशीर न करता उपचारासाठी परवानगी दिली.

पूर्ण शांततेने आणि एकाग्रतेने डॉ. बल्लमवार यांनी अँजिओप्लास्टी सुरू केली. अतिशय गंभीर स्थितीत असलेल्या रुग्णाच्या हृदयात त्यांनी यशस्वीरित्या स्टेंट बसवला आणि जीवाला धोका देणारे ब्लॉकेज काढून टाकले. रुग्णाचे हृदय जरी कमजोर आणि दुखावलेले होते, तरी ते पुन्हा हळूहळू नियमितपणे धडकू लागले आणि मृत्यूच्या दारातून परत येण्याची आशा निर्माण झाली.

पूर्ण लक्ष आणि आत्मविश्वासाने डॉ. बल्लमवार यांनी अँजिओप्लास्टी केली. अतिशय गंभीर स्थितीत असलेल्या रुग्णाच्या हृदयात त्यांनी धैर्याने स्टेंट बसवला आणि जीवघेण्या ब्लॉकेजेस साफ केल्या. जरी रुग्णाचे हृदय दुखावलेले होते, तरी ते पुन्हा नियमितपणे धडकू लागले आणि रुग्णाला मृत्यूच्या उंबरठ्यावरून परत आणण्यात यश मिळाले.

लढाई मात्र अजून संपलेली नव्हती. आयसीयूमध्ये रुग्णाला सतत व्हीपीसी आणि एआयव्हीआर सारख्या धोकादायक हृदयाच्या ठोक्यांमधील गडबडींचा सामना करावा लागला. २४ तास सतत मॉनिटरिंग आणि अचूक औषधोपचार यांच्या मदतीने त्याला स्थिर करण्यात आले. टीमच्या सतर्कतेमुळे आणि काळजीमुळे रुग्ण हळूहळू बरा होऊ लागला. आज तो स्थिर आहे ज्याला आयुष्याची दुसरी संधी मिळाली आहे.

या केसबद्दल बोलताना डॉ. बल्लमवार म्हणाले, हे केवळ वैद्यकीय उपचार नव्हते, तर एक जीवन वाचवण्याचे मिशन होते. ८०% मृत्यूचा धोका असतानाही आम्ही प्रत्येक शॉक, प्रत्येक हृदयाच्या ठोक्याशी लढलो आणि अखेर विजय मिळवला. त्यामुळेच आम्ही कधीही हार मानत नाही. या यशाचे श्रेय त्यांनी संपूर्ण टीमला दिले, विशेषतः डॉ. पंकज जैन (सिनियर ॲनेस्थेसियोलॉजिस्ट), मनोहर राऊत आणि श्री. देवेंद्र चव्हारे (सिनियर टेक्निशियन), तसेच समर्पित सिस्टर स्टाफ आणि आयसीसीयू टीम यांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. या सगळ्यांच्या एकत्रित मेहनतीशिवाय आणि अचूक समन्वयाशिवाय एवढा कठीण आणि जीव वाचवणारा उपचार शक्यच झाला नसता.

ही गोष्ट प्रत्येकासाठी महत्त्वाची आहे. हार्ट अटॅक कोणताही इशारा देत नाही, तो अचानक येतो. छातीत होणाऱ्या वेदनांकडे दुर्लक्ष करणे प्राणघातक ठरू शकते. पण वोक्हार्ट हॉस्पिटलसारख्या संस्थांमध्ये अत्याधुनिक कॅथ लॅब आणि डॉ. अमित सुरेशराव बल्लमवार यांच्यासारखे अनुभवी तज्ज्ञ असतात, जे अशा प्रसंगी जीव वाचवू शकतात आणि नशीब बदलू शकतात. हा कोणता चमत्कार नव्हता ही धैर्याने केलेली आधुनिक वैद्यकीय उपचारांची खरी ताकद होती.

# केंब्रिज दक्षिण आशियातील १,००० शाळांपर्यंत पोहचले, शिक्षणात नवकल्पना आणि उत्कृष्टता विशेष

**नागपूर, २३ जुलै :** नॅशनल: केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अ‍ॅण्ड असेसमेंट (केंब्रिज) च्या आंतरराष्ट्रीय शिक्षण विभागाने आज दक्षिण आशियामध्ये १,००० हून अधिक केंब्रिज आंतरराष्ट्रीय शाळांचा टप्पा गाठल्याची घोषणा केली. यामध्ये भारतातील ८०० हून अधिक शाळा केंब्रिजच्या शैक्षणिक कार्यक्रमांची अंमलबजावणी करत आहेत. या प्रदेशातील केंब्रिज शाळांची एकूण संख्या गेल्या वर्षभरात १६ टक्क्याने वाढली असून, २०२३ - २४ मध्ये ८९४ वरून २०२४-२५ मध्ये ती १,०३४ वर पोहोचली आहे. यामधील ८१ टक्के नवीन शाळा भारतात उघडल्या गेल्या आहेत.

दक्षिण आशियामधील सर्व केंब्रिज आंतरराष्ट्रीय शाळांपैकी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक शाळा भारतात आहेत, त्यानंतर १२ टक्के शाळा बांगलादेशमध्ये आहेत. पुण्यातील ब्रह्मप्रिया वर्ल्ड स्कूल ही केंब्रिजची १,००० वी शाळा ठरली आहे. केंब्रिज आंतरराष्ट्रीय शाळांपैकी ५३ टक्के शाळा टियर १ शहरांमध्ये आहेत, ज्यातून आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे शहरी भागांमध्ये केंद्रित होणे स्पष्ट होते. भारताच्या दक्षिणेकडील भागात लहान शहरांमध्ये केंब्रिज शाळांची सर्वाधिक वाढ झाली आहे. टियर २ आणि टियर ३ शहरांमध्ये एकत्रितपणे ४७ टक्के शाळा आहेत, जे आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा विस्तार महानगरे वगळता इतर शहरांमध्ये व गावांमध्येही होत असल्याचे दर्शवते.

दक्षिण आशियामधील आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठीचे वरिष्ठ उपाध्यक्ष विनय शर्मा म्हणाले, दक्षिण आशियामध्ये १,००० शाळांचा टप्पा पार करणे हे जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याच्या आमच्या दृढ निष्ठेचे प्रतीक आहे, जे विद्यार्थी आणि शिक्षक दोघांनाही सक्षम बनवते. आमचे शैक्षणिक कार्यक्रम केवळ शैक्षणिक यशापुरते मर्यादित नाहीत ते विद्यार्थ्यांना कौशल्ये, विचारसरणी आणि आत्मविश्वास देतात, ज्यामुळे ते हवामान बदलापासून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उदयापर्यंतच्या जागतिक आव्हानांना सामोरे जाऊ शकतात. आमच्या शाळांसोबत मिळून, आपण शिक्षणाचे भविष्य घडवत आहोत. दक्षिण आशियामध्ये केंब्रिज आपले कार्यक्षेत्र विस्तारत असताना, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला, आयुष्यभराच्या शिक्षणाला आणि जागतिक स्तरावर तयार राहण्याच्या क्षमतेला प्रोत्साहन देण्याच्या आपल्या वचनबद्धतेवर कायम आहे. नवोन्मेषी कार्यक्रम, काटेकोर मूल्यमापन आणि उपयुक्त शैक्षणिक साधनांच्या माध्यमातून केंब्रिज शिक्षण क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करत आहे आणि संपूर्ण प्रदेशात शाळांसोबत मिळून विद्यार्थ्यांचे जीवन परिवर्तन करण्याचे कार्य करत आहे.

# सॅमसंगकडून एम९ लाँच: एआय-पॉवर्ड ४के क्यूडी-ओएलईडी स्मार्ट मॉनिटर




**मुंबई, २३ जुलै :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने नवीन स्मार्ट मॉनिटर सिरीजची घोषणा केली आहे, ज्यामध्ये सर्वोत्तम एम९ (एम९०एसएफ) सह एम८ (एम८०एसएफ) आणि एम७ (एम७०एफ) चे सुधारित व्हर्जन्स आहेत. श्रेणीमध्ये प्रगत एआय वैशिष्ट्ये असण्यासह नवीन ऑफरिंग्ज काम व मनोरंजनासाठी अधिक वैयक्तिकृत आणि कनेक्टेड स्क्रिन देतात.

''सॅमसंगच्या ४के क्यूडी-ओएलईडी सर्वोत्तमतेला सर्वोत्तम व्हिजन एआयसह एकत्रित करत एम९ डिस्प्लेला मॉनिटरपेक्षा अद्वितीय अनुभवामध्ये बदलतो. वास्तविक पिक्चर आणि साऊंड ऑप्टिमाइयझेशन, आकर्षक डिझाइन आणि आवडते स्ट्रिमिंग व कामाचे टूल्स सहजपणे उपलब्ध करून देण्याच्या क्षमतेसह एम९ सर्वोत्तम, स्मार्टर व वास्तविक अनुभव देतो,'' असे सॅमसंग इंडियाच्या एंटरप्राइज बिझनेसचे उपाध्यक्ष पुनीत सेठी म्हणाले.

एम९ पहिल्यांदाच स्मार्ट मॉनिटर लाइनअपमध्ये क्यूडी-ओएलईडी तंत्रज्ञानाला सादर करतो. आकर्षक व्हिज्युअल्ससह टीव्ही-ग्रेड स्मार्ट कार्यक्षमता असलेला ३२-इंच एम९ आकर्षक कॉन्ट्रास्ट, वैविध्यपूर्ण रंगसंगती आणि लक्षवेधक व्हिज्युअल्स देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. स्लीक, ऑल-मेटल चेसिससह या मॉनिटरमध्ये म्युझियम दर्जाच्या आकर्षकतेसह कार्यक्षमता आहे, जी डिझाइन स्टुडिओ किंवा कार्यालयासाठी अनुकूल आहे.

सॅमसंगच्या स्मार्ट मॉनिटर एम९ मध्ये ओएलईडी सेफगार्ड+ आहे, जे दीर्घकाळापर्यंत स्क्रिनला कोणत्याही व्यत्ययाशिवाय कार्यरत ठेवण्यास मदत करते. तसेच प्रमुख कूलिंग सिस्टम मॉनिटर तापण्याचा धोका कमी करते. यामधील ग्लेअर-फ्री डिस्प्ले प्रतिबिंबांना कमी करते, ज्यामधून प्रखर प्रकाशामध्ये देखील सातत्यपूर्ण दृश्यमानता आणि आरामदायीपणाची खात्री मिळते.

एम९ रिअल टाइममध्ये पिक्चर व साऊंड क्वॉलिटी वाढवण्यासाठी एआय पिक्चर ऑप्टिमायझर, ४के एआय अपस्केलिंग प्रो आणि ॲक्टिव्ह वॉईस ॲम्प्लिफायर (एव्हीए) अशा एआय-संचालित तंत्रज्ञानांचा फायदा घेतो, ज्यामुळे कन्टेन्ट व आसपासच्या वातावरणाशी आपोआपपणे जुळून जात सानुकूल कार्यक्षमता देतो.

स्मार्ट एंटरटेन्मेंट हब एम९ लोकप्रिय स्ट्रीमिंग ॲप्स, सॅमसंग टीव्ही प्लस आणि सॅमसंग गेमिंग हब देतो, तसेच कंसोल किंवा पीसीची गरज न भासता क्लाऊड-आधारित गेमिंगचा आनंद देतो. १६५ हर्ट्झ रिफ्रेश रेट, ०.०३ एमएस प्रतिसाद वेळ आणि एनव्हीआयडीआयए जी-एसवायएनसी सुसंगतेसह हा मॉनिटर सुलभ, उच्च-कार्यक्षम व्हिज्युअल्स देतो, जे गेमिंग आणि इतर आव्हानात्मक टास्क्ससाठी अनुकूल आहे.

४के क्यूडी-ओएलईडी डिस्प्लेसह मॉनिटर कन्टेन्ट क्रिएटर्सना अपेक्षित असल्याप्रमाणे व्हिज्युअल्स देतो, तसेच कोणत्याही उपयोजनासाठी सुस्पष्टता व आत्मविश्वास देतो.

# रेड लेबल नॅचरल केअर सादर करत आहेत इम्युनिटी की चुस्की

**मुंबई, २३ जुलै :** यंदाच्या मान्सून मोसमात रेड लेबल नॅचरल केअर संपूर्ण भारताला आमंत्रित करत आहे एक क्षण काढून जरासं थांबण्यासाठी आणि काहीतरी गरमागरम, नॉस्टेल्जिक आणि संगीतमय अनुभवण्यासाठी. इम्युनिटी की चुस्की या आपल्या नव्या मेगा-कँपेनसह या ब्रँडने लहानपणीच्या रम्य आठवणी, वेलनेसचे फायदे आणि चहाची मजा या सगळ्याला एकत्र आणत एक अविस्मरणीय मान्सून सेलिब्रेशनचा अनुभव तयार केला आहे.

या नव्या कँपेनचा मूळ गाभा आहे मराठीतील लोकप्रिय, उत्साही बालगीत ये रे ये रे पावसा. अनेक पिढ्यांच्या पावसाळ्यातील आठवणींना या गाण्याची किनार आहे. रॅपर्स श्रेयस सागवेकर आणि कृणाल घोरपडे म्हणजेच तामडी चमडी या लोकप्रिय गाण्यासाठी ओळखले जाणारे Kreatex यांनी या गाण्याला मान्सून अँथमचे नवे रूप दिले आहे. झी ची निर्मिती आणि रंजू वर्गीस यांचे दिग्दर्शन असलेल्या या गाण्याच्या नव्या जमान्यातील नव्या रुपात पावसात मनसोक्त भिजत नाचण्याचा आनंद प्रतित होतो. या कालातीत गाण्याच्या चालीला आधुनिक पद्धतीने मानवंदना देत यात हिप-हॉप बिट्स आणि भारतीय शास्त्रीय संगीताचा सुरेख मेळ साधण्यात आला आहे.

हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेडच्या बेव्हरेजेस इंडिया, टी विभाग-रेड लेबलचे उपाध्यक्ष इशतप्रीत सिंग म्हणाले, रेड लेबल नॅचरल केअर म्हणजे फक्त चहा नाही, तर चहाच्या कपातून मिळणारा दिलासा आहे, काळजी आहे आणि संस्कृती आहे. इम्युनिटी की चुस्कीसोबत आम्ही मान्सून काळातील नॉस्टेल्जिया साजरा करत आहोत. यात आम्ही भारतातील सर्वोत्तम चहा आणि आपल्या सांगीतिक वारशातील मनाला भावणाऱ्या संगीताचा सर्जनशील मेळ साधला आहे. अजरामर चाल आणि बालपणीच्या गीताला सांगीतिक रूप देणे आणि आयुर्वेदिक रोगप्रतिकारशक्तीचे आल्हाददायक वचन अशा वैशिष्ट्यांसह या कँपेनमधून हेच दिसून येते की रेड लेबल कशाप्रकारे सातत्याने सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत, भावनिकदृष्ट्या संपन्न कथा मांडत असते.

युनिलिव्हरच्या मीडिया अ‍ॅण्ड कंटेंट एजन्सी माइंडशेअरने झी ब्रँडवर्क्ससह भागीदारीत या कँपेनची संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे.

झी एंटरटेनमेंट एंटरप्राइजेस लि. चं चीफ ग्रोथ ऑफिसर आशिष सेहगल यांनी उत्साहपूर्वक सांगितले, हे संगीत आपल्यासाठी आहे. झी मराठीमध्ये आम्ही नेहमीच आपल्या संस्कृतीशी खोलवर जोडलेले असतो, वैयक्तिक, नॉस्टेल्जिक आणि मुळांशी घट्ट नाते सांगणाऱ्या कथा मांडण्याचा झीचा वारसा आणि तत्वं जपत असतो. ब्रूक बाँड रेड लेबलच्या साह्याने आम्ही पावसाळ्यातील रोगप्रतिकारशक्तीला चालना देत आहोत. त्यासाठी प्रत्येक मराठी माणसाच्या बालपणाची ओळख असलेल्या लोकप्रिय गाण्याला आम्ही नवे रूप दिले आहे. आमच्या लोकप्रिय झी मराठी दिलफ्लुएन्सर आणि ख्यातनाम डिजिटल क्रीइटर्सना सहजसुंदररित्या एकत्र आणत हे गाणे कालातीत आणि त्याचवेळी समकालीन वाटेल याची खातरजमा आम्ही केली आहे. स्थानिक संस्कृती आणि समान भावनांचा पाया असलेला अर्थपूर्ण ब्रँड अनुभव देण्याची झीची बांधिलकी अशा सहकार्यातून प्रतित होत असते.

नॉस्टेल्जिया ही मुख्य भावना आणि संगीत हे ती भावना पोहोचवण्याचे माध्यम अशा संगमातून तयार झालेली इम्युनिटी की चुस्की ही कँपेन आहे. फक्त चहा आणि कालातीत संगीतातून मिळू शकेल अशा फिल-गूड एनर्जीमध्ये ही कँपेन भारताला रममाण करणार आहे.



## नीट/जेईई परीक्षार्थींना स्कॉलरशिप देण्यासाठी फिजिक्सवालाकडून पीडब्ल्यूएनसॅट २०२५ ची घोषणा

**नागपूर, २३ जुलै :** शैक्षणिक कंपनी असलेल्या फिजिक्सवालाने (पीडब्ल्यू) पीडब्ल्यूएनएसॅट (फिजिक्सवाला नॅशनल स्कॉलरशिप कम अ‍ॅडमिशन टेस्ट) २०२५ च्या चौथ्या आवृत्तीची घोषणा केली. ही एक शिष्यवृत्ती परीक्षा आहे. हा उपक्रम नीट -यूजी आणि आयआयटी- जेईई परीक्षार्थ्यांना आपल्या आर्थिक पार्श्वभूमीची काळजी न करता शिक्षण आणि मार्गदर्शन सुलभ करून मदत करण्याचा प्रयत्न करतो.

नागपूर येथे झालेल्या एका कार्यक्रमादरम्यान या उपक्रमाची घोषणा करण्यात आली, जिथे महाराष्ट्राचे पीडब्ल्यू प्रादेशिक प्रमुख, पीडब्ल्यू विद्यापीठ नागपूरचे केंद्र प्रमुख आणि व्यवसाय प्रमुख एकत्र आले आणि त्यांनी पीडब्ल्यूएनएसॅट २०२५ च्या विविध फायद्यांबद्दल माहिती दिली. याव्यतिरिक्त, शहरातील अनेक शाळांचे मुख्याध्यापक देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.

पीडब्ल्यूएनएसॅट २०२५ परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही पद्धतीने घेतली जाईल. त्यातून सर्व प्रदेशातील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न केला जाईल. ऑनलाइन पद्धत निवडणारे विद्यार्थी १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान परीक्षेला बसू शकतात. ऑफलाइन पद्धत निवडणाऱ्यांसाठी ही परीक्षा ५ ऑक्टोबर आणि १२ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्व पीडब्ल्यू विद्यापीठ आणि स्टडी सेंटर्सवर घेतली जाईल. परीक्षेसाठी नोंदणी मोफत आहे आणि सध्या पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच पीसीएम आणि पीसीबी दोन्ही भागांमध्ये बारावी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. तिचा निकाल २५ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर होईल.

फिजिक्सवालाचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षक, अलख पांडे म्हणाले, अनेक विद्यार्थी आपल्या स्वप्नांचा त्याग क्षमता नसल्यामुळे नाही तर आर्थिक अडचणींमुळे करतात. पीडब्ल्यूएनएसॅट २०२५ हा आमचा अशा विद्यार्थ्यांना मदत करण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक मुलाला योग्य संधी मिळायलाच हवी आणि या उपक्रमातून आम्ही प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहोत, त्यांना सांगण्याचा प्रयत्न करत आहोत की त्यांची स्वप्ने महत्त्वाची आहेत आणि आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत.

या परीक्षांमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे तसेच १००% शिष्यवृत्ती दिली जाईल. या विद्यार्थ्यांना एका विशेष रँकर्स ग्रुपमध्येही प्रवेश मिळेल. तो त्यांना लक्ष्याधारित आणि धोरणात्मक मार्गदर्शन देण्यासाठी असेल. त्यामुळे त्यांना नीट यूजी आणि आयआयटी-जेईईसारख्या स्पर्धात्मक परीक्षांमध्ये चांगली कामगिरी करण्यास मदत होईल.

# कंफर्टपासून केअरपर्यंत: हिमालया बेबीकेअरची ५०० हून अधिक स्तनपान कक्षांची भारतभर यशस्वी वाटचाल

**मुंबई, २३ जुलै :** आई आणि बाळासाठी निरोगी सुरुवात सुनिश्चित करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा भाग म्हणून, हिमालया बेबीकेअरने भारतभर ५०० हून अधिक स्तनपान कक्ष यशस्वीरित्या उभारल्याची घोषणा अभिमानाने केली आहे. हे कक्ष मातांसाठी स्वच्छ, खाजगी आणि आरामदायक वातावरणात बाळाला दूध पाजण्याची सुविधा देतात. ही महत्वपूर्ण उपलब्धी म्हणजे मातांसाठी स्वच्छ आणि विचारपूर्वक तयार करण्यात आलेल्या सुविधा देण्याच्या हिमालया ब्रँडच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे विशेषतः अशा वेळी जेव्हा मातांच्या आरोग्यविषयी जागरूकता वाढवणे खूप गरजेचे आहे.



ही स्तनपान कक्षे सध्या भारतातील २७ विमानतळांवर उपलब्ध आहेत, ज्यामध्ये बेंगळुरू, हैदराबाद, कोलकाता आणि गोवा यांसारखी महत्त्वाची प्रवास केंद्रे समाविष्ट आहेत. महाराष्ट्रातही मुंबई, नागपूर, नाशिक, अमरावती, नांदेड आणि शिर्डी या प्रमुख विमानतळांवर हे खास कक्ष तयार करण्यात आले आहेत. हे कक्ष ३३ रेल्वे स्थानकांवरही उपलब्ध आहेत, विशेषतः उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये यांची चांगली उपस्थिती आहे. याशिवाय, १४१ रुग्णालयांमध्ये आणि मेट्रो शहरांतील व इतर गर्दीच्या ठिकाणांवर मिळून एकूण २६८ स्तनपान कक्ष उभारण्यात आले आहेत. त्यामुळे मेट्रो शहरांपासून प्रादेशिक केंद्रांपर्यंत हे कक्ष मातांना आरामदायक आणि खाजगी सुविधा देतात, जेणेकरून त्या कुठेही असल्या तरी बाळाला दूध पाजताना अडचण येणार नाही.

या उपक्रमाबाबत बोलताना चक्रवर्ती एन. व्ही., डायरेक्टर बेबीकेअर, हिमालया वेलनेस कंपनी, म्हणाले, हिमालया बेबीकेअरमध्ये आई आणि बाळ हे नेहमीच आमच्या कामाचे केंद्रबिंदू असतात. आमच्या स्तनपान कक्ष उपक्रमामधून आम्ही मातांसाठी काळजीपूर्वक आणि सहानुभूतीने सुविधा उपलब्ध करून देत आहोत. ही कक्षे म्हणजे त्यांच्या खासगीपणाची गरज पूर्ण करताना त्यांची हालचाल किंवा आराम यात कुठलाही त्रास होऊ नये, यासाठीचा आमचा प्रयत्न आहे.

हा उपक्रम प्रत्येक आई आणि बाळासाठी हॅपी बिगिनिंग्स म्हणजेच आनंदी सुरुवात सुनिश्चित करण्याच्या हिमालया बेबीकेअरच्या उद्दिष्टाचे प्रतीक आहे. शहरी आणि निमशहरी भागात राहणाऱ्या पालकांना रोज ज्या अडचणींचा सामना करावा लागतो, त्या लक्षात घेऊन त्यावर उपाय देत हा उपक्रम समाजात एक सकारात्मक आणि महत्त्वाचा बदल घडवत आहे. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रम आणि ब्रँडच्या उद्दिष्टांना एकत्र करून हिमालया बेबीकेअरने मातांसाठी केवळ सुविधा नाही, तर एक संवेदनशील आणि जबाबदार दृष्टिकोनही समोर ठेवला आहे जिथे मातांच्या आराम आणि काळजीला केवळ पाठिंबा नाही, तर सर्वात जास्त महत्त्व दिले जाते.

## आज का अंदाज

गुरूवार २४ जुलै २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ८ | ९ | २ | ३ | ६ | ९ |
| ६७९ | ११३ | १७० | ५६८ | ११० | २३८ | १७८ | १२६ |
| ११० | ४४७ | ३६९ | ३८८ | २२८ | ५८० | २४० | २८९ |
| २०० | ३३९ | ५६७ | २२५ | ३९० | ६७० | ३३० | ४७८ |
| २६ | ५६ | ८१ | ९१ | २८ | ३८ | ६१ | ९१ |
| २२ | ५३ | ८७ | ९७ | २७ | ३७ | ६० | ९० |
| २४ | ५४ | ८० | ९० | २५ | ३५ | ६४ | ९४ |

२४ जुलै : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ४१ | ५६ | ७६ |
| ३५ | ४५ | ५८ | ७८ |
| ३९ | ४९ | ५० | ७० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# व्यापक कौटुंबिक वारसा संरक्षणासाठी कोटक लाईफतर्फे कोटक सिग्नेचर टर्म प्लॅनचा शुभारंभ

**नागपूर, २३ जुलै :** कोटक महिंद्रा लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (कोटक लाईफ) ने कोटक सिग्नेचर टर्म प्लॅन या नवीन विमा योजनेचा शुभारंभ करत असल्याची घोषणा केली आहे. सध्या उदयास येत असलेले श्रीमंत पगारदार व्यावसायिक आणि उद्योजक यांना डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात आलेली ही एक शुद्ध संरक्षण टर्म विमा योजना आहे. ही योजना ग्राहकांना अतिशय योग्य प्रीमियम दरात भरभक्कम आर्थिक संरक्षण प्रदान करते. त्यामुळे कुटुंबांना त्यांची जीवनशैली टिकवून ठेवता येते, त्याचबरोबर आपला कौटुंबिक वारसा आणि परंपरा जपण्यासही त्यांना मदत होते.

नवीन योजनेच्या शुभारंभप्रसंगी बोलताना कोटक लाईफचे एमडी आणि सीईओ महेश बालसुब्रमण्यम म्हणाले, कोटक लाईफचे लक्ष नेहमी काळाशी अनुरूप आणि भविष्याचा वेध घेणाऱ्या विमा योजना सादर करण्यावर केंद्रीत राहिलेले आहे. कोटक सिग्नेचर टर्म प्लॅन भारतातील श्रीमंत व्यावसायिक आणि उद्योजकांच्या वाढत्या संख्येला विचारात घेऊन अतिशय काळजीपुर्वक तयार करण्यात आलेली खास योजना आहे. ही योजना त्यांच्या आकांक्षांशी जुळणारे फायदे प्रदान करते. तसेच ग्राहकांच्या बदलत्या गरजा समजून घेणे, नवोपक्रमाला चालना देणे आणि प्रत्येक व्यक्तीला त्याचे भविष्य आत्मविश्वासाने सुरक्षित करण्यासाठी सक्षम करण्याच्या बाबतीत असलेले आमचे समर्पण प्रतिबिंबित करते.

भारतात महत्त्वाकांक्षी आणि स्वयंप्रेरित व्यक्तींची नवीन पिढी उदयास आलेली आहे. ही पिढी केवळ उत्पन्नच कमवत नाही तर सक्रियपणे गुंतवणूक, बचत आणि आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी एक वारसा (विरासत) तयार करत आहे.

# शब्दकोडे क्रमांक २१७४



**आडवे शब्द :-**
१) धंदा, व्यापार
३) पूर्णपणे
६) सारखा
८) खून
९) वेतन
१०) चालू काळ
१२) उगाच, कारण नसताना
१३) गहाण
१४) आदरासह
१६) कणीदार
१७) देवीच्या नावाणे मागीतलेली भिक्षा
१९) उपनगर
२१) झकास
२२) हेळसांडा
२३) पवित्र
२४) वेळ, मृत्यू
२५) खुंट, आंचळ
२६) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
२८) तपासनीस (इं)
३०) घाव, प्रहार
३१) शपथ
३२) दाट मैत्री
३३) पिवळा
३४) पिता
३५) सटवाई
३७) पती
४०) श्रीविष्णू
४३) स्वत:चे
४४) फणसातील खाद्य
४५) राणीचा पती
४६) बिल्व
४७) सेनापती
४८) पद्धत
४९) रात्र
५०) विविध
५१) गाडीचे छत
५३) बडबड्या
५५) वजन
५६) धनी
५८) खर, रासभ
६०) अवस्था, स्थिती
६२) हरिणाची एक जात
६४) गमन करणे
६५) हमाल
६७) एक पौराणिक पर्वत
६९) अरण्य
७१) मन, मनातील विचार,
७२) मिठी
७३) न वापरलेला
७४) मोठी सतरंजी
७५) पाणी
७६) सोनार
७७) व्यापारी फायदा

**उभे शब्द :-**
१) गर्क झालेला
२) सांजवेळ
३) नातेवाईक
४) परतफेड
५) लोणचे
६) संतोषजनक
७) अंत:करण
८) हळकुंडाचे चूर्ण
९) आजोबांचे वडील
११) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
१२) अवाजवी
१५) खराब, टाकाऊ
१६) गप्पांचे आगार
१८) मुस्कटदाबी
२०) मासा पकडण्याचे साधन
२३) झाडाच्या भोवतीचा कट्टा
२५) सरसकट
२७) बैलाच्या शिंगाना बांधण्याचा दोर
२९) काटकसर
३०) माकडांची टोळी
३१) भ्रम
३४) एक बारीक धान्य
३६) विद्युल्लता
३८) धिंड काढणे
३९) तिखट मीठाचा शिरा
४१) सामान
४२) कळण्यास दुर्बोध असे
४५) रात्रीचा पाऊस
४९) एक ज्वालाग्रही पदार्थ
५०) देवादिकांत भांडणे लावणारा मुनीवर्य
५२) पळून जाणे
५४) चाकरी करणारा
५७) मनाचा ओढा
५८) गवगवा
५९) धैर्य
६१) उत्तम घोडा
५३) गावठी, गावात तयार झालेले, अस्सल
६६) माकडातील एक जात
६८) तोंडाने तोडलेला मोठा तुकडा
७०) सारखा, विषमच्या विरुद्ध

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# राशीभविष्य

**मेष :** आज तुमच्या नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी जवळीक वाढेल. तुम्हाला सत्तेत असलेल्या व्यक्तीकडून पाठिंबा आणि सहकार्य मिळेल. उपजीविकेसाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील.

**वृषभ :** आज तुम्हाला राजकारणात महत्त्वाची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत लोकांना दूरच्या देशातून चांगली बातमी मिळेल. तुम्हाला सरकारी सत्तेचा लाभ मिळेल.

**मिथुन :** आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून चांगली बातमी मिळेल. वाहन खरेदी करण्याची तुमची जुनी इच्छा पूर्ण होईल. तुमच्या नोकरीत बढतीची शक्यता असेल. शेतीशी संबंधित लोकांना यश मिळेल.

**कर्क :** व्यवसायात तुम्हाला नवीन भागीदार मिळतील. त्वचारोग आणि चर्मोद्योगाशी संबंधित लोकांना विशेष यश आणि आदर मिळेल. सत्तेत असलेल्या प्रभावशाली व्यक्तीचा तुम्हाला पाठिंबा आणि साथ मिळेल.

**सिंह :** आज तुमची खूप दिवसांपासूनची इच्छा पूर्ण होऊ शकते. अत्यंत महत्त्वाच्या कामात यश मिळेल. बेरोजगारांना काम मिळेल. तुम्हाला एखाद्या खास व्यक्तीकडून मार्गदर्शन आणि संगत मिळेल.

**कन्या :** विद्यार्थ्यांना अभ्यासाबाबत थोडी चिंता असेल. व्यवसायात तुम्हाला कठोर परिश्रम करावे लागतील. तुम्ही तुमच्या शौर्य आणि बुद्धीने तुमचा सन्मान आणि प्रतिष्ठा वाढवाल. प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**तुळ :** आज तुम्हाला काही अप्रिय बातमी मिळू शकते. काही महत्त्वाच्या कामात उशीर झाल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. कामाच्या ठिकाणी प्रसंगी अपमान सहन करावा लागू शकतो.

**वृश्चिक :** राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. क्रीडा स्पर्धेच्या क्षेत्रात प्रसिद्धी मिळेल. नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आशीर्वाद राहतील. व्यवसायात उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**धनु :** सर्व सरकारी विभागांमध्ये काम करणाऱ्या लोकांना आर्थिक लाभ आणि सन्मान मिळेल. सरकारी धोरणे तयार करण्यात आणि अंमलात आणण्यात तुम्ही महत्त्वाची भूमिका बजावाल.

**मकर :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांच्या कार्यशैलीचे संपूर्ण कंपनीकडून कौतुक केले जाईल. आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून काही चांगली बातमी मिळेल.

**कुंभ :** आजचा दिवस खूप शुभ राहील. कामाच्या ठिकाणी अडथळे कमी असतील. कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर झाल्याने मनातील आनंद वाढेल.

**मीन :** घर आणि व्यवसायाच्या ठिकाणाच्या आर्थिक कल्याणाकडे खूप लक्ष दिले जाईल. राजकारणात तुमचे प्रभावी भाषण सर्वांना आवडेल. कुटुंबात निरर्थक वाद होऊ शकतात. कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवा.

प्राचीन ऋषी-मुनी व शिल्पकार यांनी वास्तुपुरुषाची स्थिती लक्षात ठेवून वास्तु रचना करण्याचे निर्देश दिले आहेत. वास्तू देवतेच्या कोपापासून वाचण्यासाठी आणि जीवनात सुखसमृद्धी आणण्यासाठी या निर्देशांचे पालन केले पाहिजे. या शास्त्रांच्या विपरित वास्तु बांधल्यास तीथ रहाणाऱ्यांना त्रास होतो. अशावेळी घरात जे वास्तु संमत नाही त्यात बदल करून ती वास्तु रहाण्यास अनुकूल बनवू शकता. त्यासाठी खालील उपाय करा.

घरापुढे, मागे, आजूबाजूला खड्डा असेल तर तो लवकरात लवकर भरा. घरासमोर कचऱ्याचा ढिगारा असेल, न लागणारी सामग्री ठेवली असेल किंवा चिखल व घाण पाणी साठले असेल तर ते लगेचच साफ करायला हवे. घरासमोर स्वच्छ जागा असणे चांगले.

किचन किंवा डायनिंग रूम घराच्या पश्चिमेकडे नसेल तर आणि ती जागा बदलणे शक्य नसले तर जेवण करताना तोंड उत्तर, पूर्व किंवा पश्चिमेकडे असावे.

घरातील नैऋत्य कोपरा (दक्षिण-पश्चिम) कधीही रिकामा ठेवू नये. तेथे वजनदार सामान ठेवले पाहिजे.

घरात पाणी साठवण्याचे स्थान उत्तर, पूर्व किंवा ईशान्य (उत्तर-पूर्व कोपरा) दिशेला असेल तर ईशान्य कोपऱ्यातच जमिनीच्या आत पाण्याची लहानशी टाकी बनवावी आणि पाणी पिताना तोंड पूर्व किंवा पश्चिम दिशेत असायला पाहिजे.

ईशान्य कोपऱ्यात स्वयंपाकघर, बेडरूम किंवा स्टोअर रूम असेल तर ती जागा तातडीने रिकामी करावी. तिथे देवाचे चित्र लावून पूजाअर्चना करा.


स्वयंपाकघर पश्चिम किंवा दक्षिण दिशेला असेल आणि ते बदलणे शक्य नसेल तर आग्नेय कोपऱ्यात (दक्षिण-पूर्व) गॅस ठेवून तेथेच स्वयंपाक बनवला पाहिजे.

जड वस्तू उदा. धान्याच्या कोठ्या, मोठी भांडी, लोखंडाच्या जाड वस्तू, रिकामे किंवा भरलेले गॅसचे सिलेंडर, कपाटे, इत्यादी वस्तू पूर्व, उत्तर, ईशान्य कोपऱ्यात ठेवलेल्या असतील तर त्या उचलून नैऋत्य, दक्षिण किंवा पश्चिम दिशेत ठेवायला पाहिजे.

तिजोरी, कपाट किंवा पुस्तकांच्या कपाटाखाली लोखंड किंवा दगडाचे टेकण लावले असेल तर ते काढून लाकडी टेकण लावायला हवे.

तिजोरी नेहमी उत्तर दिशेकडे तोंड करून ठेवायला पाहिजे. घरात शयनकक्ष वास्तुच्या अनुरूप नसल्यास व त्याला बदलणेही शक्य नसल्यास अविवाहित मुलींनी उत्तर दिशेकडे झोपायला हवे आणि विवाहित जोडप्यांनी पूर्व दिशेच्या शयनकक्षात झोपणे टाळावे. ड्रेसिंग रूम नैऋत्य कोपऱ्यात नसेल तर वस्त्र बदलताना नेहमी तोंड उत्तरेकडे असायला हवे.

घरात आग्नेय, वायव्य, नैऋत्य कोपऱ्यात आणि दक्षिण दिशेला नळ असतील आणि नळाची पाईपलाइनसुद्धा त्याच दिशेत असेल तर घराच्या पूर्व-उत्तर किंवा ईशान्य कोपऱ्यात पाण्याची टाकी बनवून घराच्या नळांमध्ये त्या टाकीतून पाण्याचा पुरवठा करावा. स्वयंपाकघर आग्नेय कोपऱ्यात अर्थात दक्षिण-पूर्वच्या कोपऱ्यात नसेल तर दिवसा आणि संध्याकाळी या दिशेला एक दिवा जरूर लावावा.







प्रत्येक घरात किचनला (स्वयंपाकघर) अनन्यसाधारण महत्व असते. किचनमध्ये गृहिणींचे मन गुंतलेले असते. आधुनिक घरांमध्ये प्रशस्त खोलीत किचन थाटले जाते. तेथे फ्रिजर, मिक्सर-ग्राइंडर, ज्यूसर, ओव्हन यांची मांडणी सुलभ केल्यास हाताळणी करणे सोपे जाते.

किचनमध्ये उष्णता नियंत्रित करणे सर्वांत महत्वाचे असते. याचा त्रास गृहिणींना होत असतो. घरातील मंडळी याबाबत जागृत झाली असून उष्णता शोषून घेणारी आधुनिक उपकरणे बसविण्यात येतात. यामुळे उष्णता नियंत्रित होऊन गृहिणींना स्वयंपाक बनविणे आनंददायी होते. यासोबतच वास्तुशास्त्राच्या काही साध्या सूचना पाळल्यास त्यास शास्त्राचा आधारही मिळतो.

किचनसाठी आग्नेय दिशा उपयुक्त मानले जाते. बाथरूप व बेडरूम यांच्या अगदी वर किंवा खाली स्वयंपाकगृह न ठेवल्यास हितावह ठरते. किचनमध्ये हवा खेळती राहणे अत्यावश्यक आहे. खिडक्या शक्यतो पूर्व किवा पश्चिमेकडे असाव्यात. वातावरणात असणारया विधायक शक्ती किवा धागे आकर्षित होण्यास ते फायद्याचे ठरते.

हवा येण्यासाठी उत्तम व्यवस्था असावी. स्वयंपाक करतांना गृहिणींचे तोंड पूर्वेकडे असेल याची दक्षता घ्यावी. पूर्वेकडे तोंड करून स्वयंपाक करणे शुभ मानले जाते. स्वयंपाकाच्या ओट्यावर कपाट वगैरे ठेवू नये. खिडक्या एकमेकांविरूद्ध असल्यास अधिक उत्तम. फ्रिजचे किचनमधील स्थान अटळ आहे. तेव्हा फ्रिज ठेवताना स्वयंपाक घरात वायव्य दिशेस ठेवावे. स्वयंपाकाचा ओटा दक्षिण वा पश्चिमेकडील भिंतीस लागून असावा. एक्झॉस्ट फॅन ईशान्य दिशेस ठेवल्यास ठीक. परंतु, दक्षिण व पूर्व दिशाही यासाठी उपयुक्त आहे. डायनिंग टेबल किचनमध्येच पश्चिमेकडे ठेवावे. किचन नेहमी स्वच्छ ठेवावे. कचरा किवा कचऱ्याची पेटी स्वयंपाक घरात न ठेवल्यास अतिउत्तम. स्वयंपाकाचा गॅस ओट्याच्या उजव्या बाजूस ठेवावा. आजच्या चोकस गृहिणी किचनच्या रंगसंगतीकडेही चोखंदळपणे लक्ष देतात. रंगसंगती शक्यतो साधी असावी. स्वयंपाक घरातील भिंतींवर निळा किवा पांढरा रंग लावल्यास अतिउत्तम.



## दगडी घराचा जीवनावर प्रतिकुल प्रभाव!

पूर्वी मातीची घरे असायची. दगड, माती व लाकूड यांचा वापर करून घरे बांधली जात होती. परंतु, आता आधुनिक काळात विटा, सिमेंट, चुना व आसारीचा वापर घर बांधणीत केला जातो. दगडी ठोकळे एकावर एक ठेवून घरे बांधली जात असत. दगडाच्या घराचा आपल्या जीवनावर प्रतिकूल प्रभाव पडत असतो. कसा तो पहा.



१. घरासमोर दगडी खांब असेल तर त्या घरातील मुख्य व्यक्ती भांडणप्रिय असते. ही व्यक्ती कुणाशीही वाद घालण्यात अग्रेसर भूमिका घेत असते.

२. घराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर एखादा मोठ्या आकाराचा दगड असेल तर त्या घरात नेहमी वाद होतात. घरातील सदस्य एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करतात. काही वेळा तर अशी वेळ येते की, त्या घरात नवरा बायको यांच्यात झालेले वाद विकोपाला जाऊन त्याच्यात काडीमोड होण्याची शक्यता असते.

३. घरासमोर मुरूमाची टेकडी किंवा दगडी जुनाट वास्तू असेल तर त्या घरातील मुख्य व्यक्ती व त्याची मुलांमध्ये नेहमी भितीचे वातावरण असते. त्या घरातील प्रत्येकाला अडचणींचा सामना करावा लागतो.

४ घरासमोर, आजूबाजूला किंवा मागे पडलेली दगडी वास्तू असेल तर त्या घरात कोणत्याच बाजूने विकास होत नाही. मुलांच्या शिक्षणात बऱ्याच अडचणी येतात.

५. दगडी पडक्या वास्तूच्या जवळ राहणाऱ्याना तर अचडणी येतात तसेच त्याच्या आसपास राहणाऱ्या नागरिकानाही मोठ्या अडचणीना तोंड द्यावे लागते.

६ घरात नेहमी गरीबी नांदत असते. व्यवसाय व्यापारात यश मिळत नाही. तसेच नोकरीतही वाद उद्भवत असतात.

७ काही घरात दगडाच्या कमानी उभ्या केलेल्या असतात. अशा घरात राहणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींना समोरे जावे लागत असते


## घरात कुठे काय?

१. कूलर किंवा एअर कंडिशनला मुख्य करून घराच्या पश्चिमी-पूर्वी तथा उत्तरी भागात खिडकीच्या बाहेर तीन किंवा चार फुट रुंद स्टँडवर ठेवायला पाहिजे.

२. डिश एंटीनाला घराच्या छतावर दक्षिण-पूर्व दिशेत म्हणजे आग्नेय कोपऱ्यात ठेवायला पाहिजे.

३. टीव्ही एंटीनालासुद्धा आग्नेय कोपऱ्यात ठेवायला पाहिजे व टेलिव्हिजनला खोलीतील आग्येन कोपऱ्यात ठेवायला पाहिजे.

४. भवनातील पुढचा भाग उंच व मागील भाग खोल असायला पाहिजे.



जर तुमच्या घरात वास्तुदोष असेल किंवा कायम पैसाची चणचण राहत असेल अर्थात पैसा कुठून येतो आणि कुठे निघून जातो हे कळत नाही. तर या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी नेहमी आपल्या घरात थोडेसे साबूत मीठ ठेवायला पाहिजे.

साबूत मीठ ठेवण्याचे कारण हे आहे की हे पॉझिटिव्ह एनर्जीला आपल्याकडे आकर्षित करून नकारात्मक ऊर्जेला घराबाहेर काढते. म्हणूनच घरात कुठलेही शुभ कार्य करायचे असेल तर मिठाच्या पाण्याने पोचा लावायला पाहिजे.

मनात खिन्नता, भीती, काळजी असल्यास दोन्ही हातात साबूत मीठ घेऊन काही वेळ हातात ठेवून ते वॉशबेसिनमध्ये टाकायला पाहिजे. मीठ घरात इकडे-तिकडे फेकू नये. मीठ हानिकारक वस्तूंना नष्ट करतो व फंगससुद्धा लागू देत नाही.

## वास्तुशास्त्राप्रमाणे भाग्योदयासाठी हे करा

'वास्तू' म्हणजे असे घर वा इमारत जेथे राहणारे लोक सुखी, आरोग्यवान व संपत्ती राखून असणारे असा आहे. त्यामुळेच वास्तुशास्त्रात आमच्या पूर्वजांनी घऱात शांतता रहाण्यासाठी अनेक उपाय सुचविले आहेत.

१. घरात तयार केलेल्या स्वयंपाकातील प्रत्येक प्रकारचे थोडेसे अन्न एका थाळीत वेगळे काढून हात जोडून वास्तुदेवाला अर्पित केले पाहिजे. त्यानंतर घरच्यांनी जेवण केले पाहिजे. असे केल्याने वास्तुदेवता त्या घरावर नेहमी प्रसन्न राहते. वेगळे ठेवलेले अन्न नंतर गायीला द्यावे.

२. घरात तूटफुट झालेली यंत्रे ठेवू नयेत. ती घराच्या बाहेर काढून द्यायला पाहिजे. जर ती घरात ठेवली तर घऱच्यांना मानसिक अशांतता किंवा आजारपणाला तोंड द्यावे लागते.

३. ज्या घरात एका पायाचा पाट असतो, तेथे नेहमी पैशांची चणचण असते. घरातले लोक मानसिक व्याधींनी त्रस्त राहातात. त्यासाठी घरात एका पायाचा पाट ठेवू नये.

४. घरातल्या केरसुणी (झाडू) कधीही उभी ठेवू नये. जेथे पाय लागतील किंवा ओलांडावे लागेल, अशा ठिकाणीही केरसुणी ठेवू नका. तशी ठेवल्यास घरात पैसा टिकत नाही.

५. घरातल्या देवालयात तीन गणपती ठेवू नका. जर असेल तर त्यातील एकाला विसर्जित करून द्या किंवा दुसऱ्या ठिकाणी ठेवून द्या. तीन गणपती असतील तर त्या घरात कायमची अशांती राहते. त्या प्रकारे ३ देवींना किंवा २ शंखांसुद्धा एकत्र पूजाघरात ठेवणे वर्जित आहे.

६. घरातल्या ईशान्य भागात कोणताही पाळीव पशू ठेवू नका. कुत्रे, कोंबडे व म्हैस यांच्या बाबतीत सावधगिरी बाळगली पाहिजे. अन्यथा घरात अशांती पसरते.

७. प्रत्येक घरात तुळस, सीताफळ, अशोक, आवळा, हरश्रृंगार, अमलतास, निरगुडी या पैकी किमान २ झाडे अवश्य लावावीत. या झाडांमुळे घरात सुख शांती नांदते.

८. घरात नेमाने देवाचे पूजन करावे. पूजा करणाऱ्या व्यक्तीचे तोंड सदैव पूर्व किंवा उत्तरेकडे असावे. घरात दररोज तूपाचा दिवा लावावा.

९. घराच्या प्रत्येक खोलीचे दिवे एकाच वेळी लावावे. अर्थात प्रत्येक खोलीत प्रकाश पडणे आवश्यक आहे.

वरील उपाय केले तर घरातील व्याधी दूर होऊन घरातल्यांना सुख शांती मिळेल व त्यांचा भाग्योदयसुद्धा लवकरच होईल.



## वास्तुदोषपासून बचाव करण्यासाठी काही सल्ला!

कामगारांची खोली नैऋत्येस कालत्रयी नसावी. कामगार गृहात टॉयलेट्स गृहाच्या वायव्येस किंवा आग्नेय दिशेस असावी.

कारखान्याच्या मालकाला नैऋत्येस, पूर्वदिशेस किंवा उत्तरेकडे असणे श्रेयस्कर. कारभार खात्याचा भाग उत्तरेस किंवा पूर्वेकडे असावा.

खेळाच्या मैदानाची समलांबी जॉमेट्री विषम लांबी जॉमेट्रीपेक्षा श्रेष्ठ मानली जाते. मार्ग किंवा निगडीत असणार्या प्लॉटच्या पूर्वेकडचा किंवा उत्तरेचा तळभाग खेळाच्या मैदानापेक्षा खोलगट नसावा.

घर बांधताना आपण आधी हे विचारात घेतले पाहिजे, की निसर्ग व मानव यांचा समन्वय साधला जाऊन मानवाला त्याचा फायदा झाला पाहिजे. आरोग्यदायी जीवन लाभावे तसेच जीवनातील सर्व दु:खांचा नाश होऊन सुख लाभावे.

जर प्लॉट एखाद्या डोंगरी भागात असेल तर उतरण पूर्व आणि उत्तर दिशेकडे असावी. कोणताही कालवा, तलाव, नदी, विहिर, डबके प्लॉटच्या उत्तरे किंवा पूर्वेस असावे. प्लॉटच्या उत्तरेस किंवा पूर्वेस एखादा मोठा वृक्ष नसावा.

झोपताना नेहमी दिशेचे भान ठेवायला हवे. जोडीदाराचे डोके नेहमी दक्षिणेकडेआणि पाय उत्तरेकडे हवे. कधीही बेडरूममध्ये बेडच्या समोर टी. व्ही. किंवा ड्रेसिंगटेबल नसावा.

डायनिंग टेबल चौरस किंवा चतुष्कोणिय असावे, अंड्याच्या किंवा इतर कोणत्याही आकाराचे टेबल चांगले नसते. डायनिंग टेबल भोजनगृहाच्या मधोमध ठेवण्यात यावे.

तिजोरीच्या खोलीचे दार ईशान्येस, पूर्वेस किंवा उत्तरेकडे ठेवण्याचा सल्ला देण्यात येत आहे. लॉकर दक्षिण दिशेत ठेवावे आणि ते उत्तरेकडे किंवा पूर्वीकडे उघडले जावे.

त्रिकोणी प्लॉट शुभ असल्याचे मानण्यात येत नाही, कारण तशा प्रकारचा प्लॉट भागीदार आणि काम करणारे यांच्या वतीने अडचणींना निर्माण करणारा ठरू शकेल. अनियमित आकार नसलेले आणि बेढप प्लॉट बांधकामासाठी चांगले नसतात.

दक्षिणेची किंवा पश्चिमेकडील तटबंदी इतर भिंतीच्या तुलनेने अधिक भक्कम असावी कारण तिच्या बाबतीत सुरक्षेच्या जास्त खबरदारीची गरज असते.

दार किंवा खिडक्या कुठल्याही खोलीचा महत्त्वपूर्ण भाग असतो. त्याद्वारे खोलीत सकारात्मक किंवा नकारात्मक ऊर्जेचा प्रवेश होतो. वास्तुदोषापासून वाचण्यासाठी बेडरूमचे मुख्य द्वार उत्तर-पूर्व दिशेला असायला हवे.

दिवाणखाना आधुनिक पठडीतला असेल तर फर्नीचर दक्षिण आणि पश्चिम दिशेत राखणे योग्य आहे. दिवाणखान्याचा उत्तर आणि पूर्वेकडचा भाग शक्य असेल तेवढा मोकळा ठेवावा.



दिवाणखान्यात अणकुचीदार कोपर असलेला टेबल ठेऊ नये, कारण त्यामुळे वाद आणि मतभेद यांचे पेव फुटू शकेल. तिजोरी कधीही दिवाणखान्यात ठेऊ नये, कारण त्यामूळे आर्थिक परिस्थितीवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते.

दुकानातील सज्जे किंवा खालची छप्पर दक्षिण किंवा पश्चिम दिशेकडे असावीत. दुकानात ईशान्य दिशेकडचा कोपरा मोकळा असावा. हा कोपरा कोणत्याही प्रकारची सामुग्री साठवण्यासाठी वापरण्यात येऊ नये.

दुकानातील सारी छायाचित्रे आणि मूर्त्या पूर्वेस किंवा पश्चिमेकडे तोंड करून असाव्यात. दुकानात मूर्तीची स्थापना करताना दक्षिणायन आणि उत्तरायणाचे भान ठेवावे.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना लो. टिळक राष्ट्रीय पुरस्कार

## १ ऑगस्ट रोजी होणार पुरस्काराचे वितरण



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (हिंद स्वराज्य संघ) वतीने देण्यात येणारा यंदाचा ४३ वा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार, केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांना जाहीर झाला आहे. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत पुरस्काराची घोषणा केली.

शुक्रवार १ ऑगस्ट रोजी टिळक स्मारक मंदिरात सकाळी १०.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण होणार असल्याचे डॉ. टिळक यांनी सांगितले.

डॉ. टिळक म्हणाले, लोकमान्यांच्या चतुःसूत्रीतील स्वदेशीचा स्वीकार करत गडकरी यांनी रस्त्यांच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीत मोठे कार्य सुरू केले आहे. विविध प्रकारच्या वाहन निर्मितीत स्वदेशीचा पुरस्कार व प्रसार त्यांच्याकडून होत आहे.

देशाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांची ४३ व्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

यावेळी लोकमान्य टिळक राष्ट्रीय सन्मान देऊन गौरविलेल्या आजवरच्या पुरस्कारार्थीच्या जीवन कायार्चा आढावा घेणारा इंग्रजी ग्रंथ तयार करण्यात आला आहे. या ग्रंथाचे प्रकाशन पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, असेही डॉ. टिळक यांनी नमूद केले.

लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार १९८३ पासून देण्यास सुरुवात झाली. पहिला पुरस्कार एस.एम. जोशी यांना हा पुरस्कार देण्यात आला असून आतापर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी, कॉम्रेड डांगे, इंदिरा गांधी, डॉ. मनमोहन सिंग, अटलबिहारी वाजपेयी, प्रणव मुखर्जी, ज्येष्ठ नेते शरद पवार, राहुलकुमार बजाज, जी. माधवन नायर, एन. आर. नारायण मूर्ती, डॉ. शिवथाणू पिल्ले, मॉटेकसिंग अहलुवालिया, डॉ. कोटा हरिनारायण, डॉ. के. सिवन, बाबा कल्याणी, डॉ. सायरस पुनावाला, सुधा मूर्ती यांच्यासह अन्य दिग्गजांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

# ट्रक-बस भीषण अपघातात दोन ठार

## २० जखमी

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २३ :
संभाजीनगर ते नागपूर राष्ट्रीय महामार्गावर पेडगाव गावाजवळ आज २३ जुलै रोजी सकाळी साडेसहाच्या दरम्यान ट्रक आणि लक्झरी बस यांच्यात झालेल्या भीषण अपघातात २ प्रवाशांचा मृत्यू झाला असून, २० जण जखमी झाले आहेत. यातील सहा प्रवासी गंभीर जखमी असून, त्यांच्यावर वाशीम, शेलुबाजार आणि कारंजा येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.






सिंध ट्रॅव्हल्सची एमएच ३७ डब्लू ७७७२ क्रमांकाची लक्झरी बस पुण्याहून कारंजा कडे जात असताना, नागपूरकडून संभाजी नगरकडे जाणाऱ्या ट्रकला समोरासमोर धडकली. ही धडक इतकी जोरदार होती की, लक्झरी बसचा आणि ट्रकचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला.

या अपघातात बस वाहक मुकेश विठ्ठल नाटे (वय ३६, रा. बर्डे प्लॉट, शिवमंदिर, अकोट) हे जागीच ठार झाले. तर बसचालक अशोक वानखडे (वय ५५, रा. अकोट) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, यामध्ये ट्रक चालकही गंभीर जखमी झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच १०८ रुग्णवाहिका, पोलिस कर्मचारी दाखल झाले.

अपघातानंतर घटनास्थळी मोठा गोंधळ निर्माण झाला होता. यावेळी स्थानिक ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखून तातडीने मदतीस धाव घेतली आणि जखमींना बसमधून बाहेर काढत जखमींना जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले.

या अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. बचावकार्य संपल्यावर पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली असून, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिसांकडून तपास सुरू आहे.

**मदतीसाठी धावले नागरिक**

या अपघातग्रस्त परिस्थितीमध्ये स्वामी विवेकानंद आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाच्या पेडगाव येथिल तरुणांनी आणि परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने रूग्णालयात पोहचवले.

## बनावट नॉन-क्रीमी लेअर दाखला रद्द : पुजा खेडकरला धक्का

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. २३ :
गेल्या काही महिन्यांपासून देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या पूजा खेडकर हिचे नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी दिला आहे.

ओबीसी आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी 'नॉन-क्रीमीलेअर' प्रमाणपत्र आवश्यक असते, त्यामुळे पूजा खेडकरला या आरक्षणाचा लाभ घेण्याचा अधिकार नव्हता, हे आता स्पष्ट झाले आहे. या निर्णयामुळे वादग्रस्त आयएएस पुजाच्या अडचणी वाढणार आहेत.

## वसतिगृहात विद्यार्थिनीचा विनयभंग

### गृहमंत्र्यांच्या शहरात चालले काय? वडेट्टीवार यांचा संताप



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २३ :
ओबीसी मुलींच्या वसतिगृहात शिरून एका विद्यार्थिनीचा विनयभंग करण्यात आल्याची संतापजनक घटना राज्याचे गृहमंत्र्यांच्या नागपुरात घडली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी त्यांच्यावर टीकेची झोड उठवत नागपुरात कायद्याचा धाक उरला नाही का? असा खडा सवाल केला आहे.

सदर घटना २२ जुलै रोजी मध्यरात्री ३ च्या सुमारास घडली. २ आरोपी वसतिगृहाच्या प्रवेशद्वाराचा कडीकोंडा तोडून आत शिरले. त्यानंतर एका विद्यार्थिनीच्या खोलीत प्रवेश करून तिचा विनयभंग केला. तिच्याशी गैरवर्तन केले. त्यानंतर तिचा मोबाईल घेऊन ते पसार झाले.

पीडित तरुणीच्या तक्रारीनंतर एमआयडीसी पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण आरोपींचा माग काढण्यात पोलिसांना अद्याप यश आले नाही. घटना घडली त्या ओबीसी मुलींच्या वसतिगृहात एकूण ६४ मुली राहतात. या घटनेमुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.

विशेष म्हणजे या वसतिगृहात एवढ्या मोठ्या संख्येने मुली राहत असल्या तरी तिथे सुरक्षेच्या नावाने कोणतीही उपाययोजना करण्यात आली नव्हती. वसतिगृहात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पुरेशी व्यवस्था नव्हती. यावर मोठा संताप व्यक्त केला जात आहे.

दुसरीकडे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री ज्या नागपूरचे आहेत, तिथेच मुली सुरक्षित नाहीत. काल नागपूरमध्ये मुलींच्या वसतिगृहात शिरून आरोपींनी विनयभंग केला. या वसतिगृहात पुरेशी सुरक्षा नाही, सीसीटिव्ही नाही, कोणाच्या भरवश्यावर मुली इथे राहतील? या मुलींचे मोबाईल चोरले गेले.

नागपुरात गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरला नाही का? वसतिगृहातील मुली प्रचंड घाबरल्या असून त्यांना सुरक्षेची हमी कोण देणार? या वसतिगृहाच्या जवळच दारूचे दुकान असल्याने या मुलींना जाता - येता कायमच असुरक्षित वाटते. वसतिगृहात दरवाज्याला साधे लॉक नाही अशा स्थितीत या मुली कशा राहणार? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केलेत. या आरोपींना तात्काळ अटक झाली पाहिजे. राज्यातील मुलींच्या वसतिगृहाची सुरक्षा वाढवली पाहिजे. या वसतिगृहात तात्काळ सीसीटीव्ही बसवले पाहिजे. तसेच राज्यातील सर्व मुलींच्या वसतिगृहात खबरदारी घेतली पाहिजे. मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांच्या शहरात मुली सुरक्षित नसतील तर इतर ठिकाणी मुलींची काय हालत असेल? असेही वडेट्टीवार म्हणाले.



# वेगाने वाहणार वारे! मुसळधारचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :

**राज्यातील बहूतांश भागांमध्ये पाऊस पुन्हा एकदा सक्रीय झाला आहे. विदर्भातील वाशिम, बुलढाणा, अकोला या शहरांमध्ये देखील पावसाने धुमाकूळ घातला आहे. अशातच आता पुन्हा एक नवा इशारा पावसाने दिला आहे. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार येत्या २४ तासात शहरासह राज्याच्या बहुतांश भागात पाऊस हजेरी लावणार आहे.**

**तर मुंबई शहर आणि उपनगरांसह, पालघर, रायगड, रत्नागिरी, ठाणे या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

भारतीय हवामान खात्याने नागपूर जिल्ह्यामध्ये २६ जुलैपर्यंत जिल्ह्यात मुसळधार पाऊस, वादळीवारा, मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवली आहे. २४ व २६ जुलैला येलो अलर्टह्व तर २५ जुलैला ऑरेंज अलर्ट दिला असुन या कालावधीमध्ये काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवलेली आहे.

या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. विजगर्जना होत असताना शक्यतो घरातच राहणे आवश्यक आहे. अशा कालावधीमध्ये भ्रमणध्वनी सोबत बाळगू नये. विजगर्जना सुरू असताना घरातील इलेक्ट्रिकल उपकरणे बंद ठेवावी. पाऊस व विज गर्जना होत असताना झाडाच्या खाली उभे राहू नये व शेतात काम करत असताना सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप खांडे यांनी केले आहे.

नदी, नाले, दुथडी भरून वाहत असतात तेव्हा पाणी पुलावरून किंवा रस्त्यावरून वाहत असते, अशा वेळी चुकूनही तो पुल किंवा रस्ता चालत किंवा गाडी मधुन ओलांडण्याचा प्रयत्न करू नये. अधिक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपूर जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६२६६८ येथे संपर्क साधावा.

: लोकसेवार्थ :

## अनाथांच्या आधारस्तंभ जयश्रीताई




लोकजागर

समाजातील वंचित, अनाथ, अंध अपंग घटकांना मदतीचा हात देऊन अशा घटकांना मुख्य सामाजिक प्रवाहात आणण्याचे सेवाभावी कार्य करणाऱ्या सेवाकुंड ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून संस्थेच्या आधारस्तंभ आयुष्मती जयश्री अनिलकुमार गायकवाड यांचा वाढदिवस नुकताच ठाण्यामध्ये अंध विद्यार्थ्यांसोबत सहृदयतेने साजरा करण्यात आला.

माणुसकीच्या मूल्यांची जपणूक करणाऱ्या या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या अंध विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे जयश्रीताईंच्या हस्ते करण्यात आले. आयुष्यात प्रथमच मुंबई पाहिलेल्या या अंध विद्यार्थयांनी या निमित्ताने मौजमजा करत जीवाची मुंबई केली.

याच वाढदिवस सोहळ्याचे औचित्य साधून बौद्ध संस्थेच्या वतीने जयश्रीताई गायकवाड याना माता रमाई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर सामाजिक क्षेत्रातील काही महिलांचा हिरकणी पुरस्काराने गौरव केला गेला. अतिशय हृदयस्पर्शी अशा सोहळ्याला एमएमआरडीसीचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिलकुमार गायकवाड, सुप्रसिद्ध अभिनेत्री मानसी नाईक, लातूरचे माजी खासदार आणि सुप्रीम कोर्टाचे वकील डॉ. सुनील गायकवाड, सेवाकुंड ट्रस्टचे अध्यक्ष अश्वजीत गायकवाड, उपाध्यक्ष नंदकिशोर शहाडे, सचिव अभिजित गायकवाड, भाजप नेते विश्वजित गायकवाड, उद्योजक विजयकुमार गायकवाड, विजयकुमार गायकवाड, सेवाकुंड ट्रस्टी संजय कर्णिक, अतुल भोसले, ॲड. महेंद्र दलालकर, महेश चौहान, अनिल सोनपाटकी, पुणे सेवाकुंड प्रमुख राजेश सूर्यवंशी, भरत मिसाळ, रामलिंग पटसाळगे, राजकुमार पाटील यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

एक माणूस म्हणून जीवन जगताना आपण प्रत्येकजण आपल्या समाजातील अनेक घडामोडींचे साक्षीदार असतो. किंबहुना आपल्या सर्वांगीण जडणघडणीत याच समाजाचे आपल्यावर ऋण असतात. म्हणूनच आपण या समाजाचे देणे लागतो आणि याच सद्हेतूने आपण समाजासाठी आपला खारीचा वाटा उचलून आपल्या परीने काहीतरी करायला हवे अशा प्रांजळ भावनेतून अनेकजण सामाजिक हितासाठी कार्यरत असतात.

महाराष्ट्र शासनाच्या एमएमआरडीसी विभागाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिलकुमार गायकवाड हे देखील असेच सेवाभावी व्यक्तिमत्व. आपण समाजाचे देणे लागतो या कृतज्ञ भावनेतून गायकवाड यांनी सेवाकुंड सामाजिक ट्रस्टची स्थापना केली आहे.

याच सेवाकुंडाच्या माध्यमातून समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना ज्यांची आर्थिक परिस्थिती दुर्बल आहे अशा विद्यार्थ्यांना त्याच बरोबर आदिवासी पाड्यातील गरीब विद्यार्थ्यांना सातत्याने शालेय गणवेश आणि साहित्याचे वाटप करण्यात येते.

महाराष्ट्रातील पालघर, नाशिक, मराठवाडा, पुणे, डहाणू अशा अनेक भागातील गरीब विद्यार्थ्यांना ट्रस्टच्या माध्यमातून आर्थिक मदतीचा हात दिला गेला आहे. सेवाकुंड सामाजिक ट्रस्टच्या माध्यमातून सुप्रसिद्ध समाजसेवक डॉ.अनिलकुमार गायकवाड यांच्या एकसष्ठी निमित्त मागच्या वर्षी वृक्षकुंड हीरक महोत्सवी संकल्पाचा शुभारंभ मुंबईतील दीपक जोती टॉवर्सच्या परिसरात स्वामी प्रज्ञानंद सरस्वती यांच्या शुभहस्ते आंबा, जांभूळ, पेरू अशा फळझाडांचे रोपटे देऊन करण्यात आला होता. डॉ. अनिलकुमार गायकवाड यांच्या एकसष्ठी निमित्त आयोजित हीरक महोत्सवी वृक्ष कुंड या संकल्पनेअंतर्गत ठाणे, पालघर, नाशिक, नगर अशा महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील निवडक १० गावांमध्ये तसेच मुंबई आणि परिसरातील सोसायट्या आणि अनाथाश्रमांच्या परिसरात आंबा, पेरू, जांभूळ, आवळा अशा एकूण ६१ हजार फळझाडांची लागवड करून या वृक्षांचे संवर्धन करण्याचा संकल्प सोडला गेला आहे. प्रत्येक जिल्ह्यात रोजगार, पर्यावरण रक्षण, आरोग्य, शिक्षण आणि जलसंचय असा पंचसूत्री कार्यक्रम देखील सेवाकुंड ट्रस्टने राबविला आहे.

■ ■ ■

: मान-सन्मान :

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा INSCR २०२५ राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान





महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या कर्तव्यपूर्ण कायार्साठी विशेषतः संपूर्ण राज्यात सर्वप्रथम बीड जिल्हा पोलिस दलाच्या संयुक्त सहयोगातून बेटी बचाओ बेटी पढाओ या अभिनव प्रचार प्रसार कार्याकरिता प्रोत्साहन देवून प्रेरित करत कार्य करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरिनम येथे राष्ट्रपती चंद्रिका प्रसाद संतोखी यांच्या हस्ते विशेष गौरव सन्मान INSCR 2025 प्रदान करण्यात आला आहे.

नवकिरण संस्था बीड जिल्हा पोलिस फाऊंडेशन च्या वतीने संपूर्ण राज्यात सर्वप्रथम पोलिस दलाच्या संयुक्त सहयोगातून भारत सरकारचे महत्वपूर्ण अभियान बेटी बचाओ बेटी पढाओ च्या प्रचार व प्रसारासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या सहयोग प्रेरणेतून लाडली बेटीयाँ या हिंदी चॅरिटी चित्रपटाची निर्मिती करुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरुन इरॉस इंटरनॅशनल मिडीया लि. व नेदरलँड येथील आर.एफ.आय. स्टुडिओ व नेपाळ फिल्म असोसिएशन सोबत उत्तराखंड सरकार च्या संयुक्त सहयोगातून लाडली बेटीयाँ ची निर्मिती करण्यात आली आहे.

ऑगस्ट 2025 मध्ये या चित्रपटाचे सर्व स्तरावरुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शन करुन महाराष्ट्र पोलिस कल्याण निधीस आर्थिक सहाय्य उभा करण्याच्या महत्वपूर्ण उद्देशाने मुंबई येथील सामाजिक युवा कार्यकर्ते राकेश शंकरराव गायकवाड यांनी संपूर्ण प्रदर्शन व चित्रपटाचे अधिकार घेवून आपला सहयोग नवकिरण संस्था पोलिस फाऊंडेशन ला दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सहयोगामुळेच बीड जिल्हा पोलिसांच्या द्वारेच सामाजिक जनजागरणाकरिता कार्य करण्यासाठी पोलिसांच्या द्वारे अभिनव उपक्रमा बद्दल आंतरराष्ट्रीय स्तरावरुन सुरिनम प्रशासनाच्या संयुक्त सहयोगातून राष्ट्रपती चंद्रिका प्रसाद संतोखी यांनी विशेष गौरव सन्मान ISNCR 2025 पारामारिबो येथे देवेंद्र फडणवीस यांच्या पश्चात सुरिनम येथील भारताचे राजदूत सुभाष गुप्ता व नवकिरण संस्था पोलिस फाऊंडेशन यांच्याकडे सुपूर्द केला.

महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपालांना ई-मेल द्वारे विनंती पत्र पाठवून फडणवीस यांना त्यांच्या द्वारे पुरस्कार प्रदान करण्याकरिता कळविण्यात आलेले आहे. लवकरच नवकिरण संस्था पोलिस फाऊंडेशनच्या सर्व मान्यवर सदस्यांसोबत पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## नियुक्तींचा नवा घोटाळा उघडकीस

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३ :
नियुक्तींमध्ये झालेल्या घोळाचे नवे प्रकरण पुढे आले आहे. महत्वाची बाब म्हणजे, स्वतः उच्च न्यायालयाने हा घोटाळा उघडकीस आणला आहे. नियुक्तीमधील गैरप्रकार वारंवार निदर्शनास आणून दिल्यावरही उपाययोजना न केल्यामुळे उच्च न्यायालयाने केंद्राच्या भूमिकेवरही नाराजी व्यक्त केली.

लिक्विडेशन प्रक्रियेत सहाय्य करण्यासाठी विशेष, अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते, मात्र या कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामात गुंतवले जात आहे. लिक्विडेशन प्रक्रिया वेळेत पूर्ण व्हावी ही लिक्विडेटरची जबाबदारी आहे. मात्र, या कर्मचाऱ्यांना सातत्याने पगार आणि इतर सुविधा मिळत राहाव्या यासाठी अनेक वर्षे ही प्रक्रिया लांबवली जाते, असे मत न्यायालयाने नोंदवले. एका प्रकरणात १९६० मध्ये सुरू झालेली लिक्विडेशनची प्रक्रिया आता कुठे मागील आठवड्यात पूर्ण झाल्याचा उल्लेख न्यायालयाने केला. लिक्विडेशनच्या अनेक प्रकरणात कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची गरजच नसते, मात्र तरी देखील या नियुक्त्या केल्या जात आहेत.

कंपनीची कर्जफेड झाल्यावर उर्वरित रक्कम कायदेशीररित्या कंपनी लिक्विडेशन खात्यात जमा करणे आवश्यक आहे. मात्र, लिक्विडेरद्वारा कॉमन पूल फंड तयार करण्यात आले. फंडमधील रकमेचा वापर करून नियुक्त कर्मचाऱ्यांचा पगार व इतर सुविधा दिल्या जात असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

## सक्तीची कर्ज वसुली केल्यास ठोकून काढू

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २३ :
राज्यातील शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनावर अद्याप सरकारकडून ठोस पावले उचलली गेली नसतानाच दुसरीकडे बँकांकडून सक्तीची वसुली सुरू असल्याने माजी मंत्री बच्चू कडू चांगलेच आक्रमक झालेत.

अमरावतीमध्ये एका बँक मॅनेजरला थेट फोन करून 'शेतकऱ्यांकडून सक्तीची वसुली केली, तर तिथेच ठोकून काढू,अशी इशारा वजा धमकी बच्चू कडू यांनी दिली. टाकरखेडे गावातील एका शेतकऱ्याला बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखा व्यवस्थापकाने थेट घर हरजाबाबत धमकी दिल्याचा आरोप आहे. कडू यांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी थेट फोन करून मॅनेजरला खडसावले.

## महादेव मुंडेंना २० मिनिटे हालहाल करून मारले

■ वृत्तसंस्था, बीड, दि. २३ :
परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्येप्रकरणी



वाल्मीक कराडचे माजी सहकारी विजयसिंह बांगर यांनी आज पत्रकार परिषद घेत मोठे खुलासे केले आहेत. वाल्मीक कराडचा मुलगा श्री कराड आणि त्याच्या सहकाऱ्यांनी महादेव मुंडेंना हालहाल करून मारल्याचा आरोप विजय बांगर यांनी केला आहे.

महादेव मुंडे यांच्या शवविच्छेदन अहवाल समोर आल्यानंतर आता महादेव मुंडे यांच्या हत्येचे फोटोही विजयसिंह बांगर यांनी पत्रकार परिषदेत दाखवले. मुंडे हत्येप्रकरणात तीव्र आंदोलनानंतर राज्य सरकारने एसआयटी नेमली आहे. खासदार बजरंग सोनवणे यांनीही एसआयटी नेमण्याची मागणी केली होती. या प्रकरणात महत्त्वाची भूमिका बजावणारे वाल्मिक कराडचे माजी सहकारी विजयसिंह बांगर यांनी पत्रकार परिषद घेऊन महादेव मुंडेंना कुठे आणि कसे मारले याची संपूर्ण माहिती दिली.

महादेव मुंडे घरी जात असताना कराडचा मुलगा श्री आणि त्याच्या साथीदाराने रेकी केली आणि हत्या केली. मुंडेंची क्रूर हत्या करण्यात आली. त्यांच्या पायावर जखमा करण्यात आल्या. रेंगाळत असताना गालावर वार केला, नंतर अन्न नलिकेवर वार करण्यात आला. किमान २० मिनिटे मारहाण झाली, असे विजय बांगर यांनी सांगितले. छोट्या प्लॉटच्या वादातून इगो दुखावल्याने मारहाण करण्यात आली, असा दावाही त्यांनी केला.

## राज्यव्यापी एसआयटी स्थापन होवूनही नागपूर पोलिसांची अटक मोहीम सुरूच

**शालार्थ आयडी घोटाळा**

**कायदेशीर गोंधळ वाढला**

■ अरूण कराळे
वाडी, दि. २३ :
महाराष्ट्र सरकारने शालार्थ आयडी घोटाळ्याच्या चौकशीसाठी राज्यव्यापी विशेष तपास पथक (एसआयटी) गठीत केल्यानंतरही, नागपूर पोलिसांनी अटक मोहिमेला गती दिली असून त्यामुळे कायदेशीर आणि प्रशासकीय गोंधळ निर्माण झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा अधिवेशनात या घोटाळ्याचे गांभीर्य अधोरेखित करत संपूर्ण राज्यभरातील बनावट शालार्थ प्रकरणांची चौकशी करण्यासाठी राज्यस्तरीय एसआयटी स्थापन केल्याची घोषणा केली.

या निर्णयानंतर राज्यात एकाच चौकशी यंत्रणेकडून कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती.

शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आमदार प्रविण दटके यांच्या मागणीला उत्तर देताना स्पष्ट केले की, विभागीय चौकशी ही राज्यभरातील सर्व प्रकरणांना लागू होणार असून, तिची कालमयार्दा किमान तीन ते चार महिने असणार आहे.

तरीदेखील, नागपूर सायबर पोलिसांनी २० जुलै रोजी प्राचार्य शेषराव आसाराम कुथे आणि हेमंत मधुकर राठोड या दोघांना बनावट शालार्थ दस्तऐवजांचा वापर करून पगार प्रक्रिया केल्याच्या आरोपावरून अटक केली. या कारवाईमुळे नागपूर पोलिसांचा तपास आणि नव्याने स्थापन झालेल्या राज्यव्यापी एसआयटीमधील समन्वय अभाव स्पष्टपणे दिसून येतो.

विशेष म्हणजे, नागपूर विभागीय एसआयटीची स्थापना एप्रिल २०२५ मध्ये करण्यात आली होती. परंतु राज्यव्यापी एसआयटीची घोषणा झाल्यानंतर त्या विभागीय तपास पथकाचे औपचारिक विलीनीकरण किंवा विसर्जन करण्यात आलेले नाही. त्यामुळे एकाचवेळी दोन यंत्रणांकडून सुरू असलेली कारवाई ही सर्वोच्च न्यायालयाच्या ह्यसमांतर चौकशीह्व विषयक मार्गदर्शक तत्त्वांनाही छेद देणारी आहे.

अशा परिस्थितीत, नागपूर पोलिसांची एकतर्फी अटक मोहीम ही कायदेशीरदृष्ट्या अनधिकृत ठरू शकते. न्यायालयीन आदेशाशिवाय अशा कारवायांनी सरकारी चौकशीची दिशा भरकटू शकते आणि निरपराध शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते.

शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी या पार्श्वभूमीवर स्पष्ट आश्वासन दिले आहे की, राज्यस्तरीय एसआयटीकडून शिस्तबद्ध आणि न्यायसंगत पद्धतीने चौकशी केली जाणार असून, कोणत्याही निरपराध शिक्षक कर्मचा?यांवर अन्याय होणार नाही. नागरिकांनी घाबरून न जाता चौकशीस सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.